


RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

मंगळवार ०७ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८७ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Tuesday, 07 July 2026 | Year : 6 | Issue : 187 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. ०७ जुलै २०२६**



१९४५ : डॉ. बाबासाहेबांनी ७ जुलै १९४५ रोजी मुंबई येथे 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली. या संस्थेचा मुख्य उद्देश केवळ शिक्षण देणे हा नव्हता, तर बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीचा प्रसार करणे हा होता.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

## पंडवानी सम्राज्ञी तिजनबाई यांचे निधन भारतीय लोककलेच्या सुवर्णपर्वाचा अस्त




**रायपूर :** छत्तीसगडच्या लोककलेला जागतिक स्तरावर पोहोचविणाऱ्या पंडवानी गायिका तिजनबाई यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारतीय लोककलेतील एका सुवर्णयुगाचा अंत झाला असून कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

दुर्ग जिल्ह्यातील गरीब पारधी (आदिवासी) कुटुंबात १९५६ मध्ये जन्मलेल्या तिजनबाईंनी लहानपणापासूनच महाभारताचे गायन आणि अभिनय यांचा अभ्यास केला. स्त्रियांना पंडवानी सादर करण्यास मनाई असलेल्या काळात त्यांनी सामाजिक बंधने झुगारून स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण केली. त्यांच्या प्रभावी आवाजाने, अभिनयाने आणि कथनशैलीने पंडवानीला देश-विदेशात नवी ओळख मिळवून दिली.

रंगकर्मी हबीब तनवीर यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांची कला राष्ट्रीय स्तरावर पोहोचली. त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, जपान, अमेरिका आदी अनेक देशांत भारतीय लोकसंस्कृतीचे प्रतिनिधित्व केले. दूरदर्शनवरील कार्यक्रमांमुळे त्यांची लोकप्रियता अधिक वाढली.

भारतीय लोककलेतील योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या सर्वोच्च नागरी सन्मानांसह संगीत नाटक अकादमी पुरस्कार आणि अनेक मानद पदव्यांनी गौरविण्यात आले होते.

त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती, प्रधानमंत्री तसेच विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनामुळे भारतीय लोकसंस्कृतीचा एक तेजस्वी दीप मालवला असून, पंडवानीच्या माध्यमातून त्यांनी उभा केलेला सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील.



## विविध दुर्घटनांमध्ये मागील ३-४ दिवसांत १३ जणांचा मृत्यू

**मुंबई :** राज्यात सर्वदूर मोठा पाऊस कोसळत आहे. ठिकठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. मुंबईत रात्री घडलेल्या एका दुर्दैवी घटनेत चाळीचा भाग कोसळून ६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे प्रशासनाने शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. दुसरीकडे, घाटमाथ्यावर दरड कोसळल्याने मुंबई-पुणे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. पुणे शहर आणि परिसरात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून प्रशासनाने मुंबई, ठाणे, पालघर आणि पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांना आज सुट्टी जाहीर केली असून, नागरिकांना अत्यंत आवश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पावसामुळे कर्जत आणि लोणावळा दरम्यानच्या दक्षिण-पूर्व घाट परिसरात, ठाकूरवाडी ते मंकी हिल दरम्यान रेल्वेच्या मुख्य मार्गावर दरड कोसळली आहे. यामुळे मध्य रेल्वेने या मार्गावरील अनेक लोकल आणि एक्स्प्रेस गाड्या रद्द केल्या आहेत, तर काहींचे मार्ग बदलले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंकवरील बोगदा क्रमांक २ च्या बाहेर देखील पहाटेच्या सुमारास दरड कोसळली. सुरक्षेची खबरदारी म्हणून आज पहाटे ४ वाजेपासूनच या मार्गावरील वाहतूक इतर मार्गांवर वळवण्यात आली आहे.

एकीकडे नैसर्गिक आपत्तीने राज्याला घेरले असताना, दुसरीकडे मुंबईत सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात याचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे. राज्यातील विविध भागांत झालेल्या दुर्घटना, मुंबई-पुण्यातील वाहतूक कोंडी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यांवरून विरोधक आज सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे आज विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळू शकते.

राज्यातील पावसाचे आणि राजकीय घडामोडींचे प्रत्येक अपडेट सर्वात आधी मिळवण्यासाठी वाचत राहा आमचा हा 'महाराष्ट्र लाईव्ह ब्लॉग'...

# पावसाळी अधिवेशनात अतिवृष्टीचा गाजलेला मुद्दा

## पूरस्थितीवर सरकारची उच्चस्तरीय बैठक



**मुंबई :** महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनात रविवारी राज्यभरातील अतिवृष्टी, पूरस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापन हे प्रमुख चर्चेचे विषय ठरले. मुंबईसह कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि घाटमाथ्यावर मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याने विधानसभेच्या कामकाजावरही त्याचा परिणाम झाला. काही काळासाठी कामकाज तहकूब करण्यात आले. मुख्यमंत्री यांनी मंत्रालयातील आपत्ती नियंत्रण कक्षात वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन राज्यातील पूरपरिस्थिती, दरडी कोसळण्याच्या घटना, बचाव व मदतकार्याचा आढावा घेतला. जिल्हा प्रशासनांना सतर्क राहण्याच्या आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. दरम्यान, विरोधी पक्षांनी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, पूरग्रस्तांना तातडीची आर्थिक मदत, पिकांचे पंचनामे आणि आपत्ती व्यवस्थापनातील त्रुटींवर सरकारला सभागृहात धारेवर धरले. सरकारने आवश्यक ते सर्व उपाययोजना सुरू असून मदतकार्य युद्धपातळीवर सुरू असल्याचे स्पष्ट केले. राज्यातील मुसळधार पावसामुळे मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग आणि जुना मुंबई–पुणे महामार्गावर दरड कोसळल्याने वाहतूक बंद ठेवावी लागली. या परिस्थितीचाही परिणाम अधिवेशनातील चर्चेवर झाला. हवामान विभागाने अनेक जिल्ह्यांना 'रेड अलर्ट' जारी केला असून प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. काही जिल्ह्यांमध्ये शाळांनाही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय प्रवास टाळावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### एकाच पावसात महाराष्ट्र ठप्प! 'इमर्जन्सी' जाहीर करा, शरद पवार यांच्या पक्षाच्या नेत्यांची मागणी

पुणे : राज्यात कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागात भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्याचे अधिवेशन सुरू असताना पुणे-मुंबई दरम्यानची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. या गंभीर परिस्थितीवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर अत्यंत आक्रमक शब्दांत निशाणा साधला आहे.

"एवढे मोठे प्रकल्प करताना सरकारने पर्यावरणाचा अजिबात विचार केलेला नाही. परिणामी, अवघ्या एका पावसात संपूर्ण महाराष्ट्र पॅरलाइझ (ठप्प) झाला आहे," अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी सत्ताधाऱ्यांचा समाचार घेतला. "सत्तेतील लोक नेहमी ७० वर्षांचा हिशोब मागतात, पण गेल्या १२ वर्षांपासून सत्तेत बसलेल्या या लोकांच्या कामाचा हिशोब कोण देणार?" असा प्रश्न उपस्थित करत सुळे यांनी गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्तेत असलेल्या भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना चांगलेच धारेवर धरले. राज्याचे अधिवेशन सुरू असताना अशी स्थिती निर्माण होणे हे सरकारचे अपयश असल्याचे त्या म्हणाल्या. खासदार सुप्रिया सुळे यांनी सोमवारी सकाळी महापालिकेत भेट दिली. त्यावेळी त्यांनी महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पावसामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. त्या म्हणाल्या, पुणे-मुंबई दरम्यानची कनेक्टिव्हिटी पूर्णपणे ठप्प होणे ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. हे सरकार स्वतःला 'इन्फ्रास्ट्रक्चरचे सरकार' म्हणवून घेते, पण जर त्यात जनतेची सुरक्षाच नसेल आणि पर्यावरणाचा कोणताही विचार नसेल, तर अशा कामांचा काय उपयोग?" असा संतप्त सवाल सुळे यांनी केला. सध्याच्या सद्यस्थितीत नागरिकांना प्रवास टाळण्याचे आवाहन त्यांनी केले असून मुख्यमंत्र्यांनी राज्यात तातडीने 'एमर्जन्सी' घोषित करावी, अशी मागणी केली. विरोधी पक्षांवर नेहमी ७० वर्षांच्या कार्यकाळावरून टीका करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना सुप्रिया सुळे यांनी उत्तर दिले. त्या म्हणाल्या, "गल्लीपासून दिल्लीपर्यंत आज यांचेच सरकार आहे. सत्ताधारी नेहमी ७० वर्षांचा हिशोब मागतात, पण आज महाराष्ट्राची जी दुर्दशा झाली आहे, त्यावरून यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळाचा हिशोब कोण देणार? सत्तेतील लोकांना केवळ पक्ष फोडण्यात आणि घरे फोडण्यात रस आहे. हे पाप करण्यासाठी सरकारकडे वेळ आहे,















मंगळवार, ०७ जुलै २०२६
Tuesday, 07 July 2026

“ संकटे ही माणसाची खरी परीक्षा घेतात... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## बहुजन सौरभ संपादकीय

# स्वर थांबला, वारसा जिवंत

छत्तीसगडच्या मातीत जन्मलेली आणि आपल्या असामान्य कलेच्या बळावर जगभरातील रसिकांच्या हृदयात स्थान निर्माण करणारी पंडवानी गायिका तिजनबाई यांचा जीवनप्रवास अखेर संपला. त्यांच्या निधनाने केवळ एका लोककलावंताचा अंत झालेला नाही, तर भारतीय लोकसंस्कृतीचा एक तेजस्वी दीप मालवला आहे. त्यांच्या जाण्याने लोककलेच्या विश्वात निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. गरीब पारधी (आदिवासी) कुटुंबात जन्मलेल्या तिजनबाईंना बालपणापासूनच संघर्षाचा सामना करावा लागला. स्त्रियांना सार्वजनिकरीत्या पंडवानी गायन करण्यास मनाई असलेल्या काळात त्यांनी सामाजिक बंधने झुगारून आपल्या कलेचा मार्ग निवडला. समाजाचा विरोध, आर्थिक संकटे आणि कौटुंबिक अडचणी यांचा सामना करत त्यांनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. म्हणूनच त्यांचा प्रवास हा केवळ एका कलाकाराचा नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचा इतिहास आहे. पंडवानी ही महाभारतावर आधारित लोककला पूर्वी मर्यादित परिसरातच ओळखली जात होती. तिजनबाईंनी आपल्या दमदार आवाजाने, प्रभावी अभिनयाने आणि अप्रतिम कथनशैलीने या लोककलेला राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले. त्यांच्या सादरीकरणात केवळ गायन नव्हते; त्यात अभिनय, भाव, संवाद, संगीत आणि लोकजीवनाचा आत्मा होता. त्यामुळे त्यांचे प्रत्येक सादरीकरण प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय ठरत असे. भारतीय लोककलेची ताकद ओळखणाऱ्या अनेक मान्यवरांनी त्यांना प्रोत्साहन दिले. रंगकर्मी हबीब तनवीर यांनी त्यांची कला देशासमोर आणली. त्यानंतर त्यांनी भारतातील विविध राज्यांबरोबरच इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, जपान, अमेरिका यांसह अनेक देशांमध्ये भारतीय संस्कृतीचा झेंडा फडकवला. दूरदर्शनवरील कार्यक्रमांमुळे त्यांची कला घराघरांत पोहोचली आणि पंडवानीला नवे आयाम मिळाले. तिजनबाईच्या कर्तृत्वाची दखल घेत भारत सरकारने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या सर्वोच्च नागरी सन्मानांनी गौरविले. संगीत नाटक अकादमी पुरस्कारासह अनेक विद्यापीठांनी त्यांना मानद पदव्या बहाल केल्या. हे पुरस्कार केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचे प्रतिक नव्हते, तर भारतीय लोककलेच्या सन्मानाचे प्रतिक होते. त्यांच्या निधनानंतर राष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेल्या श्रद्धांजलीतून त्यांच्या कार्याची व्याप्ती स्पष्ट होते. एका लोककलावंताला देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाकडून मिळालेला हा सन्मान लोकपरंपरेच्या सामर्थ्याची साक्ष देणारा आहे. आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात लोककला अनेक संकटांना सामोरी जात आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आणि बदलत्या मनोरंजनाच्या माध्यमांमुळे अनेक पारंपरिक कला लोप पावत आहेत. अशा काळात तिजनबाईचा जीवनप्रवास आपल्याला सांगतो की, प्रतिभा, मेहनत आणि चिकाटी असेल तर गावातील छोटीशी कला देखील जागतिक स्तरावर पोहोचू शकते. त्यांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे स्त्री-सक्षमीकरण. पुरुषप्रधान परंपरेत त्यांनी स्वतःचा मार्ग तयार केला. महिलांना बंदी असलेल्या क्षेत्रात त्यांनी यशस्वी प्रवेश करून सामाजिक रूढींना आव्हान दिले. त्यामुळे त्या केवळ लोककलावंत नव्हत्या, तर संघर्ष, स्वाभिमान आणि आत्मविश्वासाचे प्रेरणास्थान होत्या. आज आवश्यकता आहे ती त्यांच्या वारशाचे जतन करण्याची. पंडवानीसारख्या लोककलांचे दस्तावेजीकरण, संशोधन, शाळा-महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात समावेश, युवा कलाकारांना प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य यासाठी शासनाने विशेष धोरण राबविणे गरजेचे आहे. सांस्कृतिक संस्थांनीही लोककलेचे महोत्सव, कार्यशाळा आणि प्रशिक्षण शिबिरे नियमितपणे आयोजित केली पाहिजेत. लोककला केवळ संग्रहालयात जपण्याची गोष्ट नाही; ती समाजाच्या दैनंदिन जीवनात जिवंत राहिली पाहिजे. लोककला ही एखाद्या प्रदेशाची ओळख नसून राष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा पाया असते. ज्या समाजाला आपल्या लोकपरंपरांचा अभिमान असतो, तो समाज सांस्कृतिकदृष्ट्या अधिक समृद्ध असतो. तिजनबाईनी आयुष्यभर भारतीय लोकसंस्कृतीचा दीप प्रज्वलित ठेवला. आता तो दीप विझू नये, ही जबाबदारी शासन, सांस्कृतिक संस्था आणि समाज या तिघांचीही आहे. तिजनबाईचे निधन ही एक दुःखद घटना असली, तरी त्यांनी घालून दिलेला आदर्श आणि त्यांनी निर्माण केलेली सांस्कृतिक परंपरा कायम प्रेरणादायी राहील. त्यांचा सुरेल आवाज काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी त्यांच्या कलेचा नाद भारतीय संस्कृतीच्या इतिहासात चिरंतन घुमत राहील. त्यांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या कलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि लोककलेला राष्ट्रनिर्मितीच्या केंद्रस्थानी स्थान देणे. अशा कलाकारांचा प्रवास कधीच संपत नाही; ते आपल्या कलेतून आणि संस्कृतीतून सदैव जिवंत राहतात. ●●

## अभिधम्म पिटक

# सत्याच्या पत्रकारितेचा उच्चतर मार्ग




पत्रकारिता घटना सांगते. बातम्या पोहोचविते. या सोबतच समाज मनावर प्रभाव टाकणारी एक शक्ती आहे. शब्द लोकांना जागे करतात, विचार देतात, परिवर्तन घडवितात. तेच शब्द जर असत्य, द्वेष, भीती आणि भ्रमाने भरले असतील, तर ते समाजाचे नुकसान करतात. त्यामुळे पत्रकारितेचा प्रश्न फक्त काय घडले? हे सांगताना, ते कसे सांगितले गेले? ते सांगताना मनाची अवस्था काय होती? हा अधिक मूलभूत प्रश्न असतो. आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात प्रत्येक सेकंदाला लाखो माहितीचे प्रवाह लोकांच्या मनात प्रवेश करतात. सामाजिक माध्यमे, चित्रवाहिन्या, दृश्यफिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सतत चालणारी माहितीची स्पर्धा चालते. त्यामुळे बातमी भावना निर्माण करणारी माध्यम बनली आहे. एका शीर्षकाने आशा निर्माण होऊ शकते. एका छायाचित्राने समाज अस्वस्थ होऊ शकतो. एका खोट्या बातमीने लाखो लोकांची मानसिकता बदलू शकते. त्यामुळे पत्रकारितेची जबाबदारी आज पूर्वीपेक्षा अधिक वाढली. सामान्य पत्रकारिता अनेकदा प्रसिद्धी, दर्शकसंख्या, स्पर्धा आणि सनसनाटीपणाच्या मागे धावते. सत्यापेक्षा वेगाला महत्त्व दिले जाते. विचारापेक्षा प्रतिक्रिया विकल्या जातात. लोकांच्या मनातील भीती, लोभ, राग आणि गोंधळ यांचा वापर करून प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. अशावेळी बौद्ध पत्रकारिता एक वेगळा मार्ग दाखवते. बौद्ध पत्रकारिता ही बुद्धांच्या शिकवणीवर आधारित पत्रकारिता आहे. ती सत्य, करुणा, अहिंसा, जागरूकता आणि आत्मपरीक्षण यांवर उभी आहे. येथे पत्रकार बातमी लिहिण्यापूर्वी स्वतःच्या मनाचा शोध घेतो. तो स्वतःला विचारतो. मी ही बातमी का लिहित आहे? माझ्या शब्दामागे राग आहे का? प्रसिद्धीची इच्छा आहे का? माझी मांडणी कोणाला दुखावणार आहे का? मी समाजात शांतता वाढवतो आहे की संघर्ष? हे प्रश्न विचारण्याची क्षमता ज्यातून निर्माण होते. तो बौद्ध धम्मातील सर्वात सूक्ष्म आणि उच्च अभ्यास होय. त्याला अभिधम्म पिटक म्हणतात. त्रिपिटकातील पहिले दोन पिटक जीवन, आचार, उपदेश आणि संघजीवन समजावतात. तर अभिधम्म मनाच्या अगदी सूक्ष्म स्तरावर प्रवेश करतो. तो मन कसे कार्य करते. विचार कसे निर्माण होतात. भावना कशा तयार होतात. सत्य कसे विकृत होते. मन भ्रमाकडे कसे वळते याचा अभ्यास करतो. म्हणून अभिधम्माला ‘उच्चतर धम्म’ असे म्हटले जाते. अभिधम्म म्हणजे मनाचा नकाशा आहे. अभिधम्म सांगतो. हे जग दोन प्रवाहांवर चालते. नाम आणि रूप. रूप म्हणजे शरीर आणि नाम म्हणजे मन. शरीर दिसते. पण मन दिसत नाही. तरी देखील मन हेच सर्व अनुभवांचे केंद्र आहे. बुद्धांनी सांगितले. सर्व गोष्टी मनापासून सुरू होतात. आपण जग जसे पाहतो तसे जग नसते. आपण ज्या मनाने पाहतो तसे ते आपल्याला दिसते. पत्रकारितेत ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. घटना बाहेर घडते. पण बातमी मनात तयार होते. दोन पत्रकार एकाच घटनेकडे पाहू शकतात. पण दोघांची बातमी वेगळी असते. कारण घटना समान असते. पण मन वेगळे असते. एका पत्रकाराच्या मनात राग असेल तर बातमी आक्रमक बनेल. दुसऱ्याच्या मनात दया असेल तर ती संवेदनशील बनेल. एखाद्याच्या मनात पूर्वग्रह असेल तर सत्य विकृत होईल. म्हणून अभिधम्म पत्रकाराला सर्वप्रथम स्वतःच्या मनाचे निरीक्षण शिकवतो.

अभिधम्म सांगतो की मन स्थिर नसते. ते प्रत्येक क्षणी निर्माण होते आणि नष्ट होते. डोळ्याची पापणी मिचकावण्याच्या वेळेत अनेक चित्तक्षण निर्माण होतात. प्रत्येक क्षणाला नवा विचार जन्म घेतो. हे विचार स्वतंत्र नसतात. ते भावना, इच्छा, लक्ष, अनुभव आणि पूर्वस्मृती यांच्या साहाय्याने तयार होतात. आज आधुनिक मेंदूविज्ञान मेंदूतील अतिवेगाने होणाऱ्या प्रक्रियांचा अभ्यास करते. परंतु अभिधम्माने हजारो वर्षांपूर्वी मनाच्या क्षणिक स्वरूपाची जाणीव करून दिली होती. अभिधम्मात मनाचे अनेक प्रकार सांगितले आहेत. काही मनःस्थिती अकुशल आहेत. लोभ, द्वेष, मोह, भ्रम, अहंकार, निर्लज्जपणा आहे. काही मनःस्थिती कुशल आहेत. जागरूकता, करुणा, मैत्री, समता, आनंद, शील हेच गुण पत्रकाराच्या शब्दांत उतरतात. पत्रकारितेतील प्रत्येक शब्द हा मनातील सूक्ष्म प्रक्रियेचा परिणाम असतो. म्हणूनच बौद्ध पत्रकारिता केवळ माहितीची अचूकता पाहत नाही. ती मनाची शुद्धताही पाहते. अभिधम्मात ५२ चेतसिक सांगितले आहेत. हे मनाचे सूक्ष्म घटक आहेत. स्पर्श, भावना, ओळख, इच्छा, लक्ष, एकाग्रता, जागरूकता, करुणा, भय, लाज, आनंद अशा अनेक मानसिक प्रक्रियांनी एक विचार तयार होतो. याचा अर्थ असा की कोणतीही बातमी अचानक तयार होत नाही.

**बौद्ध पत्रकारिता-१२**



**भूपेंद्र गणवीर**
**मो. 9850031019**

ती अनेक मानसिक घटकांमधून जन्म घेते. याच कारणामुळे छोटासा पूर्वग्रह संपूर्ण बातमीचे स्वरूप बदलू शकतो. आज आपण पाहतो की अनेकवेळा बातमीपेक्षा तिची मांडणी अधिक प्रभाव टाकते. एकाच विषयावर वेगवेगळ्या माध्यमांतून वेगवेगळे चित्र उभे राहते. हे का घडते? कारण मन वेगळे आहे. अभिधम्म पत्रकाराला शिकवतो की आधी स्वतःची प्रतिक्रिया ओळखा. कारण प्रतिक्रिया चुकीची असेल तर विश्लेषण चुकीचे होईल. विश्लेषण चुकीचे असेल तर समाज दिशाभूल होईल. अभिधम्मातील ‘अनत्ता’ ही संकल्पना येथे महत्त्वाची ठरते. अनत्ता म्हणजे स्थिर असा ‘मी’ नाही. माझी जात, माझा पक्ष, माझा गट, माझा विचार ही अंतिम सत्ये नाहीत. ती तात्पुरती ओळख आहे. पत्रकाराने जर या ओळखींपलीकडे जाऊन पाहिले तरच तो सत्याला स्पर्श करू शकतो. या देशात ८० वर्षात अशी पत्रकारिता निर्माण झाली असती. तर देशाचे चित्र वेगळे असते. खरा राष्ट्रवाद, समाजवाद दिसला असता. मात्र नकली राष्ट्रवादाच्या आड लोकांचे शोषण चालू आहे. देशातील १०० कोटी लोकांची क्रयशक्ती नाही. परिणामी कर्ज काढून खरेदी सुरू आहे. त्या खरेदीचे हप्ते भरत मृत्यूला कवटाळतात. यास विद्यमान पत्रकारिता जबाबदार तिला आता सोडावे लागेल. बुद्ध पत्रकारिता अंगिकारावी लागेल. तेव्हाच भारत पुन्हा विश्वगुरू बनू शकेल. अन्यथा नेते कितीही ओरडले. ती विश्वगुरूच्या दिशेने विस टक्केही जाणे अशक्य आहे. आज पत्रकारितेतील सर्वात मोठे संकट म्हणजे पूर्वग्रह होय. कधी राजकीय, कधी सामाजिक, कधी आर्थिक, कधी जातीय, अभिधम्म सांगतो. ज्या मनात मोह आहे ते सत्य पाहू शकत नाही. आज आधुनिक मानसशास्त्र ज्याला मानसिक पूर्वग्रह म्हणते. त्याचे तत्त्व अभिधम्मात आधीपासून आहे. अभिधम्म पत्रकाराला स्वतःला विचारायला शिकवतो. ही बातमी लोकहितासाठी आहे की प्रसिद्धीसाठी? माझ्या शब्दातून शांतता निर्माण होईल की तणाव? ही आत्मपरीक्षणाची प्रक्रिया म्हणजेच बौद्ध पत्रकारितेची खरी सुरुवात असते. अभिधम्माचा व्यावहारिक उपयोगही अत्यंत महत्त्वाचा आहे. सम्यक वाचा म्हणजे योग्य बोलणे. प्रत्येक शब्द सत्य, हितकारक आणि करुणायुक्त असावा. जागरूक पत्रकारिता म्हणजे घटनेची सुरुवात होय. परिणाम आणि समाजावर होणारा प्रभाव समजून घेणे. पूर्वग्रहमुक्त लेखन म्हणजे ‘आपण’ आणि ‘ते’ हा भेद विसरणे. वाचकाच्या मनाचे संरक्षण म्हणजे भीती नव्हे तर जागरूकता निर्माण करणे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, खोटी छायाचित्रे, दिशाभूल करणारी माहिती आणि आभासी वास्तव यांच्या काळात अभिधम्माची सजगता अधिक आवश्यक झाली आहे. तंत्रज्ञान माहिती देऊ शकते. विवेक देऊ शकत नाही. वेग देऊ शकते. दिशा देऊ शकत नाही. दिशा देण्याचे काम जागृत मन करते आणि जागृत मन तयार करण्याचा मार्ग अभिधम्म दाखवतो. म्हणून बौद्ध पत्रकारिता ही केवळ नोकरी नाही. ती धम्माची सेवा आहे. ती समाजाच्या मनाचे आरोग्य जपण्याची साधना आहे.ती शब्दांमधून करुणा निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. ती सत्याला आवाज देण्याची जबाबदारी आहे. अभिधम्म पत्रकाराला बाहेरचे जग बदलण्यापूर्वी स्वतःकडे पाहायला शिकवतो. जो पत्रकार अभिधम्म समजतो. तो समाजाच्या मनात विवेक पेरतो. तो द्वेषाऐवजी समज निर्माण करतो. तो भ्रमाऐवजी जागरूकता निर्माण करतो. तो शब्दांना करुणेचा स्पर्श देतो आणि जेव्हा पत्रकाराचे मन शुद्ध होते. तेव्हा समाजाचाही आरसा स्वच्छ होऊ लागतो. हीच बौद्ध पत्रकारितेची खरी शक्ती आहे. हीच अभिधम्म पिटकाची सर्वोच्च देणगी आहे. धम्मो रक्खति धम्मचारी. जो धम्माचे आचरण करतो. धम्म त्याचे रक्षण करतो. धम्मो रक्खतु! ●●

# सावधान! देश बदलला आहे...

भारतापेक्षा अमेरिकेचे क्षेत्रफळ तिप्पट आहे; पण लोकसंख्या फक्त 31 कोटी आहे आणि भारताची लोकसंख्या 135 कोटी आहे. इतर कशात असो वा नसो पण याबाबत देशाचा फारच विकास झाला आहे. लोकसंख्येबरोबरच हा देश आणखी काही गोष्टीत सर्वात पुढे आहे. येथे हजारो भाषा, धर्म आणि जाती आहेत. प्रत्येकजण म्हणतोय माझाच धर्म आणि माझाच देव मोठा. येथे एक मुल सांभाळणे कठीण असले तरी अजूनही एकेका घरात 4-5 लेकरे आहेत. प्रा. रघुनाथ कर्वेंनी लोकसंख्या नियंत्रणासाठी शंभर वर्षांपुर्वी प्रयत्न केले. पण ते फारसे यशस्वी ठरले नाही. कुत्र्यांप्रमाणे मुले सुद्धा रस्त्यावर भटकत असतात. त्यांना ना धड शिक्षण, ना संस्कार, ना शिस्त, ना आचार. सगळे अगदी बिनधास्त. 'जिते रहो मस्त'. देशातील 1 लाख 60 हजार कंपन्या बंद झाल्याचे आणि सहा कोटी लोक बेरोजगार झाल्याचे वित्तमंत्री सितारामन यांनी संसदेत सांगितले. हे सांगतांना त्यांना कसलीही खंत नाही. नोकऱ्या उपलब्ध नाही; तरी आरक्षणावर सभा, परिषदा, आंदोलने मात्र सुरू आहे. मराठा, कुणबी, ओबीसी, उपवर्गीकरण यावर नेते लोक वातावरण तापवून देशातील प्रचलित द्वेषात आणखी पेट्रोल टाकत आहेत. आता तर पिण्यास पाणी सुद्धा मिळेनासे झाले. पेट्रोल, गॅस याचे पुढे काय होईल याची व पर्यावरणाची चिंता कुणालाही नाही. या धर्मनिरपेक्ष देशामध्ये जातीधर्मवादी सरकार कुंभमेळे, धर्ममेळे आणि जत्रा भरवण्यासाठी बिनधास्त झाडे तोडायला निघाले आहे.




पाऊस पडत नाही म्हणून शासकीय पुजा प्रार्थना केल्या जातील; पण झाडे तोडणे थांबवणार नाही. कुंभमेळ्यासाठी दहा हजार सुशिक्षितांनी साधूगीरीची दिक्षा घेतली व ते आता विरक्त होऊन रस्त्यावर भटकत आहेत. लग्नाचे वय टळून गेले; बायको मिळत नाही. त्यामुळे असे बिन लग्नाचे पोरे कुत्र्यावानी भटकत असल्याचे विदारक चित्र पहायला मिळत आहे. एकंदरीत लोकशाही आणि संविधान नावालाच उरले आहे. या देशात आता विरोधी पक्ष सुद्धा नावालाच आहे. जनता दिशाहीन व मरणप्राय झाली आहे. जनतेच्या स्वप्नांची राख रांगोळी होत आहे आणि युवकांचे भविष्य पायदळी तुडवले जात आहे. आरक्षण सर्वांनाच हवे. ते आता 100% होण्याच्या मार्गावर आहे. जरा धीर धरा व पहात रहा. तसेच महागाई प्रचंड वाढत आहे. खरेतर आर्थिक विकासासाठी महागाई नियमितपणे वाढत असली पाहिजे; असे माझे व्यक्तीगत मत आहे. दर सहामाहीला 4 ते 5 टक्के महागाई वाढणे हानीकारक नाही. पण आता या महागाईला सीमा उरली नाही. कारण या 'झाडखाऊ' सरकारने सर्व विश्वविक्रम पार केले आहे. सरकारी शाळा, महाविद्यालये इतकेच नाही तर विद्यापीठेसुद्धा ओस पडत आहेत. सरकारी दवाखाने, वीज व पाणी पुरवठा सुद्धा खाजगी होत आहे. मग सरकार कशासाठी फक्त टोल वसुलीसाठीच आहे का? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. जनतेला लुबाडण्यासाठी आता खुद्द सरकार पुढाकार घेत आहे. भांडवलदार, भ्रष्टाचारी नेते, दलाल, एजंट असे वेगवेगळे गिधाडे लचके तोडत आहेत. मोफत योजनांचे गाजर दाखवून सरकार स्वतः कामचोरांना ऐतखाऊ व बेवडे बनवित आहे. अंगमेहनतीचे काम करायला कोणी तयार नाही. शेतात काम करायला मजूर मिळत नाही. सगळीकडे कामचोर व बिनकामाचे माणसे आहेत. माणूस साहेब व बाई मॅडम बनले आहेत. घरात स्वयंपाकाला बाई, भांडी व धुण्याला बाई हवी; पण ती सुद्धा मिळेनाशी झाली. घरातले कामे करण्याचे प्रमाण घटल्याने कंबर व पाठ दुखीचे प्रमाण वाढले आहे. मधूमेहाचे, रक्तदाबाचे प्रमाण वाढले आहे. टेकल्याशिवाय उठता बसता येत नाही. त्यामुळे गार्डनमध्ये फिरायला जाण्याचे व फॅशनेबल व्यायाम करण्याचे प्रमाण वाढले आहे; पण स्वतःच्याच घरातले काम करण्याची लाज वाटते आहे.

**|| भीमराव एकनाथ ||**

बाजारात खाद्य पदार्थ, दूध, औषधी यात भेसळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. फळे सुद्धा रासायनीक पद्धतीने जबरदस्तीने पिकवले जात आहेत. त्याचा लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. टी.व्ही., मोबाईलमुळे फॅशन, दिखावा, अंगप्रदर्शन आणि हिंसाचारी प्रसंगामुळे गुन्हेगारी व हिसंक प्रवृत्ती वाढत चालली आहे. दारू कितीही महाग झाली तरी त्यासाठी दुकानात गर्दी वाढत आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, लोकशाही, संविधान हे शब्द आता वाट्सॲप संदेशापुरतेच उरले आहेत. खोटे बोलण्याचे प्रमाण वाढले असून माणसे पदोपदी खोटे बोलत आहेत. चोर, लबाड, भ्रष्टाचाऱ्यांना प्रतिष्ठा मिळत आहे आणि सज्जनांना वेड्यात काढले जात आहे. एकंदरीत या देशात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रामाणिक व सज्जन माणसाला जीवन जगणे असह्य होत आहे. सामान्य माणसाला जीवन जगण्यासाठी इथली परिस्थिती अत्यंत धोकादायक बनली आहे. म्हणून सावधान! आता तरी डोळे उघडा. धर्माच्या व देवाच्या कचाट्यातून बाहेर पडून वास्तविकतेचा विचार करा. देशात विस्फोटक परिस्थिती निर्माण झाली असून याचा केंव्हाही उद्रेक होऊ शकतो. वेळीच सावरलो नाही तर आपल्याच मुलाबाळांचे जीवन संकटात सापडणार आहे. आपणच आपल्या पुढच्या पीढीचा घात करण्यास कारणीभूत ठरणार आहोत. म्हणून यापुढे मुलांना जन्म देऊन त्यांना संकटात टाकू नका. मुलांवर अवलंबून राहू नका. स्वतःच्या म्हातारपणाची तरतूद स्वतः करून ठेवा. ●●

# शिक्षण व्यवस्थेवर धर्मांधतेचे सरकारी संकट...

**मौर्य राजवटीत प्रजा स्वतंत्र होती. शिक्षण खुले होते. शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्य, मुल्ये आणि सवय आत्मसात करण्याची सतत सुरू असलेली प्रक्रिया. यावर समाज जीवनाच्या पाया व देशाचा विकास अवलंबून आहे. शिक्षणामुळे जंबुद्वीप सुखी समृद्ध, आसेतू हिमाचल समाधानी होते. प्रजेला वैचारिक स्वातंत्र्य होते. तेंव्हा भद्र-भटांची भूमिका नेहमी स्वातंत्र्याविरूद्ध राहीली, आताही आहे.**

प्रजा व मौर्य राजवटीच्या विरुद्ध होऊन त्यांनी कपटाने बौद्ध मौर्य सम्राट जयद्रथाचा वध ब्राम्हण सेनापती पुष्यमित्र श्रृंगा करवी करवला. त्यांना तथागत बुद्धाचा व्यवहारवाद, मानवतावाद, भौतिकवाद, बुद्धीवाद, परिवर्तनवाद, सामाजिक स्वातंत्र्य मान्य नव्हते. समाज स्वावलंबी, जागृत होऊ नये हा त्यांचा अट्टाहास तेंव्हा होता आजही आहे. त्यांनी बुद्धाच्या कल्याणकारी तत्वज्ञानाला खीळ लावण्यासाठी बुद्ध भिक्षूंच्या कत्तली केल्या. बुद्ध विहारे, स्तूप, शिलालेख, लेणी, विश्वविद्यापीठे उध्वस्त केली. बुद्धाचे अस्तित्व मिटवण्याचा एकसुत्री कार्यक्रम राबवला. विहारे, बुद्ध प्रतिमां विद्रुप केल्या. काही बुद्धप्रतिमांना स्त्रियांचे रूप दिले. भटांनी नीचतेची सीमा ओलांडली. तरीही त्यांना बौद्ध सम्राटांनी कोरुन ठेवलेले बुद्ध विचार, दगड-पहाड-शिलावरील तत्वज्ञानाचे पुरावे पुरते मिटवता आले नाही. आजही देशाच्या कानाकोपऱ्यातील भूगर्भातून बुद्ध प्रकटतात. ८४ हजार स्तूप, लेण्या, शिलालेखांपैकी अनेकांचे अस्तित्व आज उपलब्ध आहे. बुद्धाची शिकवण सनातन असून नैतिक मुद्यावर आधारित आहे. तसा भट, भटाच्या धर्माचा कोणताही पुरावा नाही. वैदिकविचार, पुढे ब्राम्हणविचार तोच हिंदूधर्म आता सनातन धर्म असल्याचे भट पेरतात. हिंदू धर्माचा जन्म त्याची स्थापना धर्माचा संस्थापक, तत्ववेत्ता कोण हे कोणालाही सांगता येत नाही. म्हणून हिंदू धर्माचे मूळ तत्वज्ञान नाही. इकडून तिकडून घेतलेल्या तत्वज्ञानात विषमता वाढली. “हम करे, हम कहे सो कायदा’ या भटांच्या गर्भित तत्वज्ञानाने देश नासला.” कपट, खोटे पण वारंवार रेटून बोलणे हा त्याचा पेशा. त्या भांडवलावर ३-४ टक्के ब्राम्हणांनी ९६-९७ टक्के ब्राम्हणेतरांवर सत्ता गाजवली. इतरांच्या विकासाचे सर्व मार्ग हिंदू धर्माच्या नावावर बंद केले. त्यासाठी काल्पनिक ४० कोटी देवी-देवता, ईश्वर, परमेश्वर निर्माण केले. या ईश्वराने काही निर्माण केल्याचा व तो आताही करतो याचा एकही पुरावा उपलब्ध नाही. जगात जे घडले व घडते ते माणसाद्वारेच हे अधोरेखीत सत्य आहे. तरीही समाजाच्या अज्ञानाचा गैरफायदा भटांनी घेतला. अंधश्रद्धा, धर्मांधता, चमत्कार समाजात पेरला, भारतीय समाज अज्ञानी, परावलंबी केला. याची दखल सर्वप्रथम म. ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुलेंनी शिक्षणातून घेतली. समाजाच्या दुखण्याची शिक्षण ही नाळ त्यांनी शोधली. महिला शोषण मुक्तीसाठी विविध केंद्रे उघडली. मुलीं व अस्पृशांच्या शाळा उघडल्या. पत्नी सावित्रीबाईंना घरी स्वतः शिकवून शिक्षिका केली, ब्रिटिश पुरोगामी नव्हते, स्वार्थी होते. त्यांनी विषमतावादी भारतीयांवर संपत्तीसाठी राज्य केले. भारतीयांच्या विकासासाठी मुद्दाम कोणतीही योजना केली नाही. भारत देशात कारकून निर्मितीपुरते शिक्षण सुरू करणाऱ्या ब्रिटिश सरकारने म.ज्योतिबा व सावित्रीबाईच्या शाळांची दखल घेतली.




ब्रिटिश सरकारने सर विल्यम हंटर आयोग १८५४ ला नेमला. या आयोगाने प्राथ. व माध्य. शिक्षणावर जोर दिला. शिक्षणातील शिफारसींच्या अंमलबजावणीचे मुल्यमापन केले. १९४८-४९ मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली राधाकृष्णन आयोगाची निर्मिती झाली. स्वातंत्र्यानंतर भारतातील उच्च शिक्षणाचा अभ्यास करून शिफारशी करणे हा या आयोगाच्या मूळ हेतू होता. या आयोगाच्या शिफारशीमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाची १९५६ ला (युजीसी) स्थापना झाली. १९५२ ला लक्ष्मण स्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली माध्य. शिक्षणाच्या शिफारशीसाठी मुदलीयार आयोगाची स्थापना झाली. या आयोगाने १९५३ ला आपला अहवाल सादर केला. युजीसीचे अध्यक्ष डॉ. दोलतसिंग कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६४-६६ ला राष्ट्रीय शिक्षण आयोग (एनईपी) नेमला. हा आयोग देशात मैलाचा दगड ठरला. या आयोगाने १९६८ ला आपला अहवाल सादर केला. शिक्षणाच्या १०+२+३ सूत्राची शिफारस केली. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षकांचे वेतन, राष्ट्रीय स्तरावर समान वेतन श्रेणी, मातृभाषेतून शिक्षण, राष्ट्रीय उत्पन्नाचा ६ वा हिस्सा शिक्षणावर खर्च व्हावा इत्यादिंच्या शिफारस केल्या. १९६४ ला महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) पुणे येथे स्थापन करून यात विविध शासकीय शिक्षण संस्थांचे एकत्रीकरण करण्यात आले. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने एनईपी १९८६ नुसार अजा, अज. वरील जातीभेद दूर करण्यासाठी समान शिक्षणावर भर दिला. एनईपी मसुदा समितीचे अध्यक्ष प्रसिद्ध अंतराळ शास्त्रज्ञ डॉ. कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांनी तज्ञ समिती कडून हे नविन शैक्षणिक धोरण तयार केले. माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी २०१० पर्यंत ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना शिक्षित करण्याचे उद्दिष्ट मांडले. पुढे तेलंगणा शिक्षण आयोग, आरटीई आले. राज्यांनी सोयीनुसार शिक्षण विकासासाठी योजना केल्या. त्याही पुढे ३४ वर्षानंतर एनईपी 2020 लागू झाले. पुढे पूर्वीचे शिक्षणाचे १०+२+३ सुत्र बदलून ५+३+३+४ अमलात आले. भारतात एनईपी अंतर्गत शै. सुधारणा व नियोजन सुरू आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षणात एकछत्री नियमांसाठी रा.शि.आयोग एचइसीएल स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. भारताचा व्याप मोठा आहे. देशात हजारो वर्षांपूर्वीपासून धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा वाढवली गेली. ८० ते ८५टक्के समाज गरिबी रेषेखाली ठेवला गेला. शिक्षण आयोग आले पण अनुशेष भरून काढला नाही. वर्तमान सरकारने आयोगांच्या शिफारशीकडे दुर्लक्ष केला. भटांच्या शिफारशीने देश चालतो. देशात समानता प्रस्थापित झाली नाही. मनुस्मृतीची जातीविषमता जिद्दीने पाळली जाते. संविधानाचा विरोध करणारे, संविधान जाळणारे सरकारच्या सुरक्षेत मस्तावले. शिक्षणातच नव्हे तर देशात नेत्यांच्या स्तुती पाठाने सावळा गोंधळ माजला. एका बाजूला भद्राच्या कुटुंबातील (८-१०) पैकिच्या पैकी सरकारी नोकरीत किमान १०-१५ लाख रुपये मासिक वेतनाचे लाभार्थी व पिढ्यांचे संस्कारीत आहेत तर दुसऱ्या बाजूस १० ते १५ कुटुंबातील सर्वच इसम तळहातावर जीवन जगणारे. सरकार भद्रांना मांडेल समजून देशात जनता विकासाच्या स्पर्धेचे आयोजन करते. गरीब नेहमी नाडले जातात. भद्रांची गरीबीशी झूंज नाही, त्यांचे मोर्चे नाही. त्याच्या गरिबांसारख्या समस्या नाही. देशात शिक्षणाची सर्वांना समान संधी नाही. शिक्षण समान नाही. शिक्षण महाग झाले. शिक्षण क्षेत्रात व्यापार शिरला. अधिक किंमत मोजणारा पात्र ठरतो, सरकारने ८० कोटी गरिबांना महिन्याला एक वेळा अन्नधान्य देऊन देशातून गरीबी हद्दपार केल्याचा फतवा काढला. वंचितांच्या हाताला काम नाही. महागाई बेसुमार वाढली. कार्यालयात कर्मचारी कमी, कामे जास्त झाली. सरकारने सरकारी नोकऱ्यात कपात केली. वाढत्या जनसंख्येचा प्रमाणात सरकारी प्रकल्प, आस्थापणे, कारखाने नाहीत. होते ते विकले. शिक्षक कारकून, पोस्टमन झाले. शिक्षकांची अध्यापनपेक्षा इतर कामे वाढली. सरकारी शाळा गरिबांसाठी व खाजगी शाळा श्रीमंतासाठी झाल्या. सरकारी शाळा बंद व्हायला लागल्या. अद्यापणाकडे दुर्लक्ष झाले. आरक्षणामुळे वंचित समाज देशाच्या मुख्य धारेत यायला लागल्याने सरकारी स्तरावरून ही कुरघोडी सुरू झाली. सरकारने मागास समाजाशी पक्षपात व संविधान धोरणाचा विरोध केला. सत्तेसाठी पक्ष फोडी आणि यशासाठी पेपर फोडी हे नवे अध्याय देशाच्या वाट्याला आले. लोकशाहीत प्रश्न विचारणे अपराध ठरावे हे नवलच झाले. क्रमशः ■ ■

**विद्या व्यासंग**



**प्राचार्य भाऊ वासनिक**
**9423606064**

# दिनचर्या (Daily Routine)




**व्यायाम :** नियमित व्यायाम केल्यास शरीर बलवान व मांसपेशी दृढ होतात. शरीरातील अतिरिक्त चरबी नष्ट होण्यास मदत होते. आळस नष्ट होतो. शरीर व मन प्रसन्न होते आणि उत्साही वाटते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या शक्तीच्या अर्धा व्यायाम करावा. व्यायाम करतेवेळी तोंडावाटे श्वासोच्छवास होऊ लागल्यास, हृदय गती वाढल्यास, कपाळावर व चेहऱ्यावर घाम येऊ लागल्यास अर्धशक्ती व्यायाम झाला असे समजावे. अति व्यायाम करू नये. सुरुवातीला व्यायाम करताना थोडासा अंगदुखीचा त्रास होतो. परंतु नियमित व्यायाम केल्यास शरीर सुदृढ होते व उत्साह वाढतो. आहार, निद्रा व व्यायाम यांचा एकमेकांशी खूप घनिष्ठ संबंध आहे. यामुळे आरोग्यप्राप्ती होते आहारामुळे शरीराचे पोषण होते तसेच धातू संवर्धन होण्यास मदत होते. निद्रेमुळे पचन होते व व्यायामामुळे अग्नी प्रदीप्त होतो व शरीर बलवृद्धी होते. व्यायामामुळे शरीर स्वस्थ व सुदृढ होण्यास मदत होते. बांधा सुडोल व आयुष्य वाढते. व्यायाम हा नेहमी सकाळी उठून लवकर करावा.

**स्नान :** शरीरशुद्धीसाठी दररोज स्वच्छ पाण्याने अंघोळ करावी. ऋतूनुसार थंड किंवा गरम पाण्याने अंघोळ करावी. खूप जास्ती गरम पाणी किंवा थंड पाणी यांचा वापर करू नये. दररोज स्नान केल्यामुळे शरीर स्वच्छ, कांतीवर्धक तसेच अग्नि प्रदीप्त होतो व आलस्य नष्ट होते. थकवा दूर होतो व मन प्रसन्न होते.

**अनुलेपन :** आंघोळ झाल्यानंतर स्वच्छ कपड्याने अंग कोरडे केल्यानंतर शरीरावर सुगंधी तेल किंवा मॉइश्चरायझर लावावे. त्यामुळे त्वचा कोमल व स्निग्ध राहते. आजकाल आंघोळीनंतर शरीराला लावण्यासाठी निराळे क्रीम, मॉइश्चरायझर बॉडी लोशन, सनस्क्रीन लोशन यांचा उपयोग करतात.

**वस्त्र धारण :** ऋतूनुसार समाज, व्यवसाय व संस्कृतीनुसार वस्त्र धारण करावे. त्वचेचे संरक्षण करण्यासाठी धूळ, पाऊस, थंडी, वारा यापासून संरक्षण करण्यासाठी ऋतूनुसार कपडे घालावे.

**नाश्ता :** सकाळी 8.30 am ते 9.30 am या दरम्यान पौष्टिक, सुपाच्य भोजन घ्यावे. आजीविका करण्यासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी ऋतुमानानुसार चप्पल किंवा जोडे यांचा वापर करावा तसेच आपल्या सोबत छत्री, टोपी रेनकोट, गॉगल ठेवावे. यामुळे आपले ऊन, वारा, पाऊस थंडी यापासून शरीराचे रक्षण होते होते.

**दुपारचे जेवण :** दुपारचे जेवण साधारणतः एक ते दीड या दरम्यान घ्यावे. तांबूल सेवन जेवल्यानंतर पूर्वी पानाचा विडा खायची पद्धत होती. या पानामध्ये काथ, खायचा चूना, सोफ, विलायची, जायफळ यांचा समावेश असायचा. यामुळे मुख शुद्धी होण्यास तसेच जेवणाचे पचन होण्यास मदत व्हायची.

**वामकुक्षी :** जेवल्यानंतर थोडा वेळ डाव्या कडेवर आराम करावा. यालाच वामकुक्षी असे म्हणतात. त्यामुळे अन्नपचन होण्यास मदत होते.

**विश्राम :** शारीरिक व मानसिक थकवा येत असल्यास थोडा वेळ सोयीनुसार आराम करावा. त्यामुळे शरीर ताजेतवाने होऊन परत काम करण्यास ऊर्जा मिळते. ही दिनचर्या पूर्वीचे लोक नियमित करायचे. परंतु आजकालच्या धावपळीच्या व आधुनिक युगात प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार कधीही झोपेतून उठणे व जेवण करणे या गोष्टी करीत असतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर याचा निश्चितच दुष्परिणाम दिसून येतात. म्हणून शक्यतो प्रत्येकाने आपल्या सुखी व आरोग्यदायी जीवनासाठी दिनचर्येचे नियमित पालन करावे. दिनचर्येचे नियमित पालन केल्यास शरीर इंद्रिये व मन निरोगी राहते तसेच कर्तव्यनिष्ठता, नियमितता अग्निवृद्धी, बलवृद्धी व निरोगी आयुष्य ची प्राप्ती होते आणि शरीर निरंतर कार्यरत राहण्यास मदत होते. दिनचर्या ही वय, काळ, व्यवसाय आणि शरीराची अवस्था यानुसार करावी. स्वस्थ रहा मस्त रहा!! ●●

**आरोग्यम् सुखसंपदा**



**डॉ. सूर्यकांता पाटील**
**मो. 9923338047**

# “ विचारपूर्वक घेतलेले निर्णय नेहमी योग्य ठरतात... ”



# एसएसडी आणि आरएसएस






डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली एसएसडी (समता सैनिक दल स्थापना १९२७) आणि आरएसएस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापना १९२५) या दोन्ही संघटना थोड्याफार कालावधीच्या अंतराने स्थापित झाल्या आहेत. यापैकी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम सर्वत्र सुरू आहेत. समता सैनिक दलाचे पुढच्या वर्षी शताब्दी वर्ष असेल. परंतु सद्यःस्थितीत दोन्ही संघटनांच्या बांधणी पातळीवर प्रचंड तफावत दिसून येते. संघ हिंदुत्व विचारधारेवर काम करणारे सांस्कृतिक संघटन स्वतःला म्हणवून घेतो. तर दलाची स्थापना करण्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टीकोन मुले, युवकांमध्ये शिस्त लागावी, शोषित, वंचित घटकांच्या हक्काचे संरक्षण करणारी फळी निर्माण व्हावी, तत्कालीन समाजाच्या नेत्यांना संरक्षण द्यावे, शाखेत शारीरिक व्यायाम होईल अशी परेड आणि त्याला पूरक खेळ खेळणे अश्या उद्दिष्टांवर समता सैनिक दलाचे कार्य असायचे. शाखेत वैचारिक मंथन होत असल्याने समतावादी आणि मानवतावादी युवक निर्माण करण्याची समता सैनिक दल प्रयोगशाळा होती. कट्टरतेला वाव नव्हता. वर्तमानात संघाची भरभराट आणि दलाची वाताहत स्पष्टपणे नजरेत भरते. मला आठवते १९७३ - ७४ मध्ये जोगीनगर या माझ्या वसाहतीत आयु. पंडित कांबळे शाखा घ्यायचे. सायंकाळी परेड आणि विविध खेळ खेळले जायचे. जवळपास चाळीस पन्नास मुलांचा समूह होता. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर आम्ही परेड करीत जाऊन सेवा देत होतो. पुढे दलित पँथरचा उदय झाला. दलात तयार झालेला युवक त्या विचाराने भारला. मुळात शाखेत एक वैचारिक बैठक तयार झाली होती. पँथरचा विचार त्याला पूरक असल्याने युवक त्या लढ्यात सामील झालेत. समता सैनिक दल विस्कळीत होण्याला हे एक कारण असले तरी इतरही कारणे होती. युवक स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाल्याने नोकऱ्यांवर दुसऱ्या राज्यात जावू लागले. प्रामुख्याने बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावर मोठ्या संधी आरक्षित वर्गाला प्राप्त झाल्या. त्याच बरोबर ट्युशनचे फॅड विकसित होत होते. त्यामुळे मूल येण्यावर प्रभाव पडला. पालकही थोडे दलाबाबत उदासीन झालेत. रिपब्लिकन नेत्यांच्या फाटाफूटीत दलही विभाजित होत गेला. मुख्य म्हणजे दलाचे नेतृत्व करण्याच्या संघर्षात दलाचे तुकडे पडत गेलेत आणि एक शिस्तबद्ध संघटन विस्कळीत झाले. काही ठिकाणी शाखा लागायच्या पण मोजक्या. मी चंद्रपूरला नोकरीवर असतांना गौतम खरतडे तिथे युनिट उभे करण्याचा प्रयत्न करीत होते. माझी त्यांची मैत्री होती. त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यात विविध संघटनांच्या माध्यमातून प्रयत्न केले आणि शाखा उभी राहिली. साहित्य गोळा झाले. मुळात समता सैनिक दलाला नेतृत्वाचा जेवढा फटका बसला तेवढाच समाजाकडून आर्थिक मदत न मिळाल्यामुळे बसला. उच्चशिक्षित पालकांनी आपले पाल्य दलात कधी पाठवले नाहीत. शिक्षण, स्पर्धा, ट्युशन, बाह्य माध्यमांचा प्रभाव अश्या चक्रव्युहात मुले गुरफटल्याने खेळाकडेच त्यांचे दुर्लक्ष झाले तर दलाच्या शाखेत कसे सामील होणार होते. आज दलाच्या माध्यमातून ज्या शाखा कार्यरत आहेत त्यासाठी स्थानिक नागरिक, पालक यांची समाजाप्रती बांधिलकी, डॉ. बाबासाहेबांनी स्थापन केलेले एक संघटन ही असलेली भावना अधिक प्रभावी आहे. दलाच्या शाखा नियमित भराव्यात यासाठी झटणारे सैनिकही तेवढेच धन्यवादास पात्र आहेत. समता सैनिक दलाला राजाश्रय प्राप्त होणे शक्यच नव्हते. समाजाने आर्थिक मदत नियमित जारी ठेवली असती आणि पालकांनी विधायक दृष्टिकोन दलाबाबत स्वीकारला असता तर चित्र निश्चित वेगळे असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आर्थिक झळ कधी सहन करावी लागली नाही. संघांची कार्यप्रणाली गूढ आहे. हिंदुत्व, मनुवाद यावर केंद्रित आहे. सर्व राजकीय पक्षात त्यांना सहाय्य करणारे नेते आहेत. गंमत अशी की संघ ज्या हिंदुत्ववादी राष्ट्राचे स्वप्न घेऊन वाटचाल करतो त्यासाठी शाखेत येणारा आणि झटणारा बहुजन (ओबीसी) वर्गातीलच युवक आहे. जातीच्या वरच्या थरातील युवक मात्र शाखेत अपवादात्मक असतात. संघाने विविध फ्रंटल संघटनांचे जाळे निर्माण केले. सध्या पूर्ण राजाश्रय प्राप्त असल्याने संघ भरभराटीला आला आहे. संघाची राजकीय शाखा (भाजप) सत्तेत आहे. पण विविध जसे गृह (मणिपूर, पहलगाम), अर्थ, परराष्ट्र, शिक्षण, पेट्रोलियम या आघाड्यांवर सत्तेतील स्वयंसेवक शताब्दी वर्षातच अनुत्तीर्ण झाल्याचे सध्याचे वर्तमान आहे. मुळात या देशात मानवतावादी-समतावादी विचार आणि जातीयवादी विचार यांच्यात पूर्वापार संघर्ष आहे. आज जातीय विचारांचे गारूड सर्व समाजावर दिसून येते. घडणाऱ्या घटना त्याची साक्ष देतात. अश्या काळात युवकांना योग्य दिशा आणि वैचारिक वळण देण्याचे काम समता सैनिक दलाची विचारधारा आणि संघटन करू शकते. वर्तमानात ज्या विविध नेतृत्वाच्या खाली समता सैनिक दलाच्या संघटना काम करीत आहेत त्या केवळ महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील वैचारिक निष्ठेमुळे. पण, सध्या उभी ठाकलेली विविध आव्हान गृहीत धरून आपसातील नेतृत्वाने वैचारिक, तात्विक मतभेद समाप्त करून एकसंघ दल निर्माण होणे काळाची गरज आहे. त्याचबरोबर आंबेडकरी समाजाच्या शिक्षित, धनसंपन्न, नोकरदार वर्गाने समता सैनिक दलाच्या मागे तन, मन, धनाने उभे राहणे काळाची हाक आहे. विविध क्षेत्रातील कार्यरत संघटनांनी रेटा द्यावा, पुढाकार घ्यावा. समता सैनिक दलाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्या दिशेने वाटचाल व्हावी या सदिच्छा.●●



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

## बाप नावाची जात

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

“औलाद को नए कपड़ों और जूतों में देखकर, ख़ुद पुराने कपड़ों और जूतों में मुस्कुराने वाली जात को ‘बाप’ कहते हैं।” या काही ओळी नसून, प्रत्येक वडिलांच्या आयुष्याचे जिवंत चरित्र आहे. आईचे प्रेम डोळ्यांतून वाहते तर वडिलांचे प्रेम घामाच्या थेंबांतून आणि त्यांच्या त्यागातून व्यक्त होते. मुलांच्या चेहयावर आनंद पाहण्यासाठी स्वतःच्या इच्छा, गरजा आणि स्वप्नांना सहजपणे बाजूला ठेवणारा माणूस म्हणजे पिता. वडिलांच्या पायातील झिजलेल्या चपला आणि अंगावरील जुने कपडे कधीच त्यांच्या गरिबीची नव्हे, तर त्यांच्या समृद्ध मनाची साक्ष देत असतात. कारण त्यांच्यासाठी स्वतःचे सुख महत्त्वाचे नसते; मुलांच्या आयुष्यातील प्रत्येक आनंद हाच त्यांचा खरा उत्सव असतो. मुलांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या भविष्याकरिता, त्यांच्या छोट्या-छोट्या हौशी पूर्ण करण्यासाठी ते स्वतःच्या अनेक इच्छा न बोलताच गाडून टाकतात. वडील कधीच आपल्या त्यागाचा हिशेब मांडत नाहीत. ते कधी सांगत नाहीत की किती दिवस त्यांनी स्वतःसाठी काही घेतले नाही, किती वेळा स्वतःच्या गरजा टाळल्या. कारण त्यांना माहीत असते की मुलांचे हसू हेच त्यांच्या आयुष्याचे सर्वात मोठें बक्षीस आहे. त्यांच्या चेहऱयावरची स्मितरेषा ही समाधानाची असते. “माझ्या मुलांना काही कमी पडू नये,” या एका विचारातून जन्मलेली. जगात प्रत्येक नाते काही ना काही अपेक्षेवर उभे असते; पण वडिलांचे प्रेम अपेक्षाविरहित असते. ते सावलीसारखे असतात. स्वतः उन्हात उभे राहून आपल्या लेकरांना थंडावा देणारे. त्यांच्या कष्टांचा आवाज नसतो, पण त्यांच्या त्यागामुळेच मुलांच्या आयुष्याला यशाची नवी दिशा मिळत असते. म्हणूनच, वडिलांनी दिलेल्या वस्तूंची किंमत पैशांनी मोजू नका; त्यांच्या त्यागाची, प्रेमाची आणि निःशब्द मायेची जाणीव ठेवा. कारण ज्यांच्या जुन्या कपड्यांत आणि झिजलेल्या चपलांत आपल्या भविष्याची स्वप्नं विणलेली असतात, त्या व्यक्तीला जग एका शब्दात ओळखते बाबा.”●●

बहुजन सौरभ

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### विमानतळाच्या विस्ताराच्या हस्तांतरणाचा सोहळा

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उल्लेख विमानतळ हस्तांतरण सोहळा स्थळी करण्यात यावा. नुकताच नागपूर विमानतळाच्या विस्ताराच्या हस्तांतरणाचा सोहळा नागपूर विमानतळ येथे झाला. व्यासपीठावर केंद्रियमंत्री नितीन गडकरी, के. राममोहन नायक, जीएमआर एअर फोर्सचे चेअरमन जी. बी. एस. राजू आदी उपस्थित होते. केंद्रियमंत्री मंडळारचे या विस्ताराला आणि हस्तांतरणाला मंजुरी दिली. विमान हस्तांतरणाच्या सोहळ्यात प्रत्येक मंत्र्यांनी भारतरत्न नावाला फाटाफूट देऊन फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उल्लेख करून काय साधले? हे जनतेला स्पष्टीकरण द्यावे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण होऊन देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उल्लेख करून डॉ. बाबासाहेबांना लहान ठरविण्याचा प्रयत्न हा केंद्रिय मंत्रीमंडळाचा लज्जास्पद आहे.●●

- ॲड.बाबूलाल मेश्राम

# सावधान! तुमच्या घामाचा पैसा खरोखर किती सुरक्षित आहे?




जास्त व्याजाच्या मोहात आयुष्यभराची कमाई धोक्यात तर टाकत नाही ना? नागरिकांनो, सावधान! तुम्ही आयुष्यभर कष्ट करून, काटकसर करून आणि आपल्या गरजा बाजूला ठेवून जमा केलेला पैसा खरोखर किती सुरक्षित आहे, याचा कधी गंभीरपणे विचार केला आहे का? गेल्या काही वर्षांतील अनेक आर्थिक घडामोडींनी सर्वसामान्य ठेवीदारांचे डोळे उघडले आहेत. अधिक व्याजाच्या आशेने अनेक कष्टकरी, महिला, मध्यमवर्गीय आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपली आयुष्यभराची बचत विविध पतसंस्था, क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायट्या आणि गुंतवणूक योजनांमध्ये ठेवली. मात्र, काही संस्थांच्या गैरव्यवस्थापनामुळे किंवा ठेवीदारांचा पैसा जोखमीच्या क्षेत्रात गुंतवल्यामुळे संस्था आर्थिक संकटात सापडल्या. परिणाम काय? व्यवस्थापन बाजूला झाले, पण सामान्य ठेवीदार आपल्या हक्काच्या पैशासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवत राहिले! Sahara India सारख्या प्रकरणांनी एक कटू वास्तव समोर आणले आहे. जास्त व्याजाचे आकर्षण दाखवले जाते, पण संकटाच्यावेळी ठेवीदाराला स्वतःच लढावे लागते. म्हणूनच एकाच संस्थेवर आंधळा विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते. आपली संपूर्ण बचत एकाच बँकेत किंवा पतसंस्थेत ठेवण्याऐवजी तीन-चार विश्वासार्ह आणि नियमनाधीन संस्थांमध्ये विभागून ठेवणे अधिक शहाणपणाचे आहे. पैसे ठेवण्यापूर्वी संबंधित संस्था कोणाच्या नियंत्रणाखाली आहे, तिची आर्थिक स्थिती काय आहे, ठेवींना विमा संरक्षण आहे का आणि पैसे परत मिळण्याचे नियम काय आहेत, याची खात्री करणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा, जास्त व्याज मिळणे महत्त्वाचे नाही, तर तुमचे मुद्दल सुरक्षित परत मिळणे सर्वात महत्त्वाचे आहे. एकदा पैसा अडचणीत आलेल्या संस्थेत अडकला की, तो कधी आणि किती परत मिळेल, याची खात्री राहत नाही. तुमचा पैसा हा केवळ आकडा नाही. तो तुमच्या घामाचा, त्यागाचा आणि आयुष्यभराच्या कष्टाचा मोबदला आहे. त्यामुळे गुंतवणूक करण्यापूर्वी दहा वेळा विचार करा. जास्त व्याजाच्या मोहात पडू नका, आपल्या कष्टाच्या पैशाची सुरक्षा प्रथम पाहा!●●



भगवंतजी भगत
मो. 9423788232

# महाडचा संगर व डॉ. आंबेडकर सेनादल...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा महाड सत्याग्रहासाठी निघाले तेव्हा भाऊच्या धक्क्यावर अस्पृश्य बांधव एका रांगेत उभे होते. खाकी गणवेशात असलेले लोक जणु एखाद्या सैन्य तुकडीतील सैनिक वाटत होते. यांना, आंबेडकर सेनादल म्हणून त्यांची ओळख होती.पुढे आंबेडकरी सेनादल हे नाव बदलून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता सैनिक दल' असे नाव ठेवले. आज समता सैनिक दल व महाडचा संगर या दोन्हीचे शताब्दी वर्ष सुरू आहे. त्या ऐतिहासिक युद्धाचा आलेख व संघटनेचा सोनेरी इतिहास समाजापुढे ठेवणे ही काळाची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब महाड सत्याग्रहासाठी येताना हरेश्वरला उतरणार होते. कोलामांडला या ठिकाणी चोख बंदोबस्त होता. या ठिकाणी 'महार सेवासंघाने त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती. जेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाडच्या दिशेने निघाले तेव्हा महाड सत्याग्रह की जय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय अश्या घोषणाच्या निनादात अख्खे महाड दणाणून सोडले. मंडपाजवळ येताच अनंत चित्रे यांनी रायगडाकडे बोट दाखवले व तेव्हां शिवाजी महाराज की जय, जिजाऊ माँ की जय अश्या घोषणांनी सर्व परिसर हादरुन गेला व विरोधकाच्या मनात धडकी बसने सुरू झाले. शेवटी चवदार तळे आहे तरी काय व तेच ठिकाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी का निवडले? कारण चवदार तळे महाडचा मानबिंदू आहे. 525 फुट लांब 300 फुट रुंदीचा हा विस्तिर्ण जलाशय एकुण क्षेत्रफळ तीन एकर 24 गुंठे 76 चौरसवार आणि त्या भोवती ब्राह्मण वस्ती व जणु ब्राम्हणाचा बालेकिल्लाच इथुन दिसणारा रायगड, त्यामुळे ब्राम्हणाचा हा गड उध्वस्त करणे हिच या देशातील क्रांतीची नांदी होती व या आंदोलनाने शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक करणाऱ्या गागा भट्टाचाही बदला घ्यायचा होता. महाड परिषद ही गुलामगिरी मुक्त करणारे युद्ध होते. म्हणूच या क्रांतीची तुलना डॉ. बाबासाहेब यांनी फ्रेंच राज्यक्रांती शी केली. 5 मे 1789 रोजी फ्रान्समधील मुक्कामी झालेल्या राष्ट्रीय क्रांतिकारक सभेची तुलना 25 डिसेंबरला होणाऱ्या महाड परिषदेशी केली. महाडची क्रांती फ्रेंच राज्यक्रांती सारखीच आहे. फ्रेंच राज्यक्रांती ज्या जाहीर नाम्यावर झाली. त्यांच धरतीवर 1927 च्या परिषदेत 'हिंदुमात्राचा जन्मसिद्ध हक्काचा जाहीरनामा' काढला. परंतु या जाहीरनाम्याकडे इथल्या सुधारकांचे लक्ष गेले नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्राम्हणी वर्चस्वाला झुगारून बापुसाहेब सहस्त्रबुद्धे यांच्यासारख्या सुधारणावादी उदारमतवादी ब्राम्हणाच्या हातुन 25/12/1927 रात्री ठीक 9:00 वाजता मनुस्मृतीचे दहन केले. महाडच्या सत्याग्रहाने इथल्या ब्राम्हणी वर्चस्वाला झुगारून नव्या पर्वाची ही सुरवात होती. या क्रांतीला दडपण्यासाठी किंवा हे आंदोलन बदनाम करण्यासाठी चाबुकस्वार, भालाकार, कुलाबा समाचार, केसरी या समाचार पत्रकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर चहु बाजुने अग्निबाणाचा वर्षाव सुरू केला. या समाचार पत्रातून मोर्चेकऱ्यांना धमकावले जात होते. 'तुम्ही पानवठे देवळे बाटवणे बंद करा तसे न केल्यास तुमची पाठ सडकु, तेवढ्याच ताकदीने या सर्व समाचार पत्राला बहिष्कृत भारत या समाचार पत्राने उत्तर दिले.' आमची पाठी जो सडकील त्यांची टाळकी आम्ही सडकु. हे बळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या मनगटात निर्माण केले. हा पाण्याचा संघर्ष नसुन मानवी स्वातंत्र्याचा हा संघर्ष आहे. 1886 साली पलटणीतून गोपाळबाबा वलंगकर यांनी आपल्या कीर्तनातून आपल्या प्रचारातून अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे यासाठी त्यांनी भरीव कार्य केले. 'अनार्य दोष परिहार समाज' नावाची संघटना काढली. आगरकरांचा 'सुधारक' 'दिन बंधु' त्यांचे लेख प्रसिद्ध झाले. त्यामुळे ही भुमी लढण्यासाठी त्यांनी सुपीक करुन ठेवली होती. त्या शतकाच्या तिसऱ्या दशकात पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतीचे बिगुल फुंकले. वलंगकर बाबाचे जे स्वप्न होते ते पुढे घेऊन जाण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या भूमीवर घट्ट असे पाय रोवले. त्यांच्या या कार्यासाठी महाडच्या भाषणामध्ये वलंगकर बाबाचा उल्लेख करतात. हे आंदोलन म्हणजे अस्पृश्यांना गुलामीतून मुक्त होवु हाच आशावाद घेऊन हजारो अस्पृश्य या संगरात सामील झाले. सर्वाच्या डोक्यावर गाठोडे होते. दोन दिवस पुरतील एवढ्या भाकऱ्या बांधुन आले होते. लंगोट्या कोपऱ्या आणि लक्तरे झालेली धोतरे आणि लुगडी परिधान केलेली अर्धनग्न जमाव या संगरात सामील झाला. गावकीच्या रोजच्या कटकटीतून आजचा दिवस मोकळा त्यामुळे महारकीचे महार खुष होते. धार्मिक दडपशाहीच्या विरोधात हे बंड होते हिंदुच्या हिंदुस्थानात अस्पृश्य लोकांना जितका धार्मिक त्रास सहन करावा लागतो. तितका कोणीही सहन करणार नाही. जुलुम, मग तो धार्मिक असो की राजकीय, क्रांती तर होणारच. त्या साठी बहिष्कृत हितकारिणी सभेचे मोठे योगदान आहे. त्यासाठी 50 तरुणाचे एक स्वयंसेवक गट तयार करण्यात आला. त्यांना क्षेत्र विभागून देण्यात आले. नव महिन्यात त्यांनी दहा हजार लोकांना अस्पृश्य निवारणासाठी वेळ आली तर तुरुंगात जाण्याची तयारी दर्शवली आणि ही सर्व लोक महाडच्या संगरात सहभागी झाले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे लढे दिले त्यात दिर्घकाळ चालणारा लढा म्हणजे महाड सत्याग्रह.●●






प्रवीण कांबळे
मो. 9545499931

# गुगल मॅप्स (नकाशा) आणि ब्लू डॉट




आपण एखाद्या अनोळखी शहरात हरवलो की मनात भीती निर्माण होते. अशावेळी आपण मोबाईलवर Google Maps उघडतो आणि स्क्रीनवर दिसणारा निळा ठिपका (Blue Dot) आपले अचूक स्थान दाखवतो. हा निळा ठिपका नेमका आपले स्थान कसा शोधतो? संपूर्ण जगाचा नकाशा Google कसा तयार करतो? वाहतूक कशी ओळखतो? या सर्वामागे अत्याधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रचंड प्रमाणातील माहिती कार्यरत असते. Google Maps हे Google ने विकसित केलेले जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेव्हिगेशन ॲप आहे. याच्या साहाय्याने कोणताही पत्ता, रस्ता, हॉटेल, दुकान किंवा पर्यटनस्थळ सहज शोधता येते. हे ॲप वाहन, दुचाकी, पायी किंवा सार्वजनिक वाहतुकीनुसार योग्य मार्ग आणि अंदाजे वेळ दाखवते. थेट ट्रॅफिकची माहिती, ऑफलाइन नकाशे, लोकेशन शेअरिंग आणि नवीन ठिकाण जोडण्याची सुविधाही यात उपलब्ध आहे. Google Maps ची सुरुवात २००५ मध्ये झाली. त्याआधी Google ने Keyhole Inc. ही कंपनी विकत घेतली होती. या कंपनीने विकसित केलेले सॉफ्टवेअर उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने पृथ्वीचे अचूक दृश्य दाखवत असे. पुढे त्याच तंत्रज्ञानावर Google Maps आणि Google Earth विकसित झाले. संपूर्ण जगाचा नकाशा तयार करण्यासाठी Google विविध स्रोतांचा वापर करते. उच्च दर्जाच्या उपग्रह प्रतिमा, विमान व ड्रोनद्वारे घेतलेली छायाचित्रे, सरकारी रस्ते व पिनकोडची माहिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे Street View या प्रणालीद्वारे गोळा केलेला डेटा वापरला जातो. २००६ मध्ये विशेष कॅमेरे, GPS आणि नंतर LiDAR सेन्सर बसवलेल्या गाड्यांनी जगभरातील रस्त्यांचे ३६० अंश छायाचित्रण सुरू केले. त्यामुळे केवळ रस्तेच नव्हे, तर फलक, इमारती आणि परिसराची अचूक माहिती उपलब्ध झाली. या छायाचित्रांमधील मजकूर ओळखण्यासाठी OCR (Optical Character Recognition) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे रस्त्यांवरील नावांचे फलक, दुकानांची नावे किंवा इतर माहिती डेटाबेसमध्ये नोंदवली जाते. म्हणूनच अनेक छोट्या रस्त्यांची माहितीही Google Maps वर उपलब्ध असते. Google Maps उघडताच संपूर्ण पृथ्वीचा नकाशा एकाचवेळी डाउनलोड होत नाही. Google ने Map Tiles ही अत्यंत कार्यक्षम पद्धत विकसित केली आहे. संपूर्ण नकाशा २५६ × २५६ पिक्सेलच्या छोट्या चौकोनांमध्ये विभागला जातो. वापरकर्ता ज्या भागात पाहत असतो तेवढ्याच टाइल्स स्क्रीनवर लोड होतात. झूम केल्यावर अधिक तपशील असलेल्या नवीन टाइल्स दिसतात. त्यामुळे नकाशा अतिशय वेगाने उघडतो आणि इंटरनेट डेटाही कमी वापरला जातो. पृथ्वी गोल असून स्क्रीन सपाट असल्यामुळे Google Mercator Projection या गणिती पद्धतीचा वापर करते. त्यामुळे काही प्रदेश प्रत्यक्षापेक्षा मोठे दिसतात, तरीही नेव्हिगेशनसाठी ही सर्वात उपयुक्त प्रणाली मानली जाते. जगभरातील सर्व्हरवर नकाशांच्या टाइल्स साठवून ठेवणाऱ्या Content Delivery Network (CDN) मुळे नकाशा काही क्षणांत उपलब्ध होतो. एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी योग्य मार्ग शोधण्यामागे Dijkstra Algorithm कार्यरत असतो. रस्ते आणि चौक यांना संगणकीय भाषेत Nodes आणि Edges मानले जाते. प्रत्येक रस्त्याला त्यावरील प्रवासाचा वेळ हे 'वजन' दिले जाते. त्यानुसार सर्वात कमी वेळ लागणारा मार्ग शोधला जातो. मोठ्या शहरांमध्ये ही प्रक्रिया जलद व्हावी म्हणून महामार्गांना प्राधान्य देणाऱ्या आधुनिक तंत्रांचाही वापर केला जातो. Google Maps चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे Live Traffic Updates. लाखो वापरकर्त्यांचे मोबाईल त्यांच्या परवानगीने वेग, दिशा आणि स्थानाची माहिती Google कडे पाठवतात. एखाद्या रस्त्यावर अनेक वाहने कमी वेगाने चालत असल्याचे आढळल्यास त्या ठिकाणी वाहतूक कोंडी असल्याचा अंदाज घेतला जातो. यासोबतच अनेक वर्षांचा ऐतिहासिक ट्रॅफिक डेटा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून अपेक्षित प्रवासाचा वेळ (ETA) अधिक अचूकपणे सांगितला जातो. Google Maps मधील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे Blue Dot. हा निळा ठिपका तुमचे स्थान तीन तंत्रज्ञानांच्या मदतीने शोधतो. पहिले म्हणजे GPS उपग्रह, जे पृथ्वीभोवती फिरत असतात. त्यांच्या सिग्नलच्या आधारे फोन स्वतःचे स्थान निश्चित करतो. दुसरे म्हणजे Cell Tower Triangulation, ज्यामध्ये मोबाईल टॉवरच्या सिग्नलच्या आधारे अंदाजे स्थान मिळते. तिसरे म्हणजे Wi-Fi Positioning, ज्यामध्ये आसपासच्या Wi-Fi नेटवर्कच्या माहितीचा उपयोग केला जातो. या तिन्ही माहितीचे एकत्र विश्लेषण करून Google तुमचे अचूक स्थान निश्चित करते आणि ते जवळच्या रस्त्यावर दाखवते. त्यामुळे निळा ठिपका बहुतेक वेळा रस्त्यावरच दिसतो. आज Google Maps मध्ये Gemini AI चा समावेश झाल्यामुळे हा अनुभव अधिक स्मार्ट झाला आहे. आता वापरकर्ता नैसर्गिक भाषेत प्रश्न विचारू शकतो, जसे की 'शांत वातावरणातील काम करण्यासाठी योग्य कॅफे दाखवा.' AI वापरकर्त्यांच्या गरजा, स्थान आणि परिस्थितीनुसार योग्य सूचना देते. तसेच इमारती, पूल किंवा चौक यांसारख्या ओळखीच्या खुणांचा आधार घेत दिशा सांगितल्यामुळे नेव्हिगेशन अधिक सोपे झाले आहे. उपग्रह प्रतिमा, Street View आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने वास्तविक जगाचे त्रिमितीय (3D) स्वरूप अधिक प्रभावीपणे सादर केले जात आहे. आज Google Maps हे केवळ मार्ग दाखवणारे ॲप राहिलेले नाही, तर उपग्रह तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय अल्गोरिदम, बिग डेटा आणि जगभरातील अब्जावधी वापरकर्त्यांच्या सहभागातून तयार झालेली अत्याधुनिक माहिती व्यवस्था बनली आहे. आपल्या स्क्रीनवर दिसणारी साधी निळी रेषा आणि ब्लू डॉट यांच्या मागे विज्ञान, गणित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची अफाट शक्ती कार्यरत आहे.●●



डॉ. सुनिल भगत
मो. 94230 64391

# उगवते नेतृत्व - अभिजित दीपके

इतिहास घडवणारे लोक अनेकदा सत्तेच्या शिखरावरून नव्हे, तर सामान्य माणसांच्या संघर्षातून उभे राहतात.'उच्चशिक्षित युवक ते जनआंदोलनाचे नेतृत्व : अभिजित दीपके हे महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील सुमारे ३० वर्षीय उच्चशिक्षित युवक आहेत. त्यांनी पुणे येथे पत्रकारितेची पदवी संपादन केली असून, अमेरिकेतील बॉस्टन युनिव्हर्सिटीमधून पब्लिक रिलेशन्स विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. उच्च शिक्षणानंतर त्यांनी अमेरिकेत करिअरची संधी स्वीकारली. मात्र, भारतातील युवकांचे प्रश्न आणि शिक्षणव्यवस्थेतील वाढत्या विसंगतींनी त्यांना अस्वस्थ केले.

**एका टिप्पणीमधून जन्मलेली चळवळ :** १५ मे २०२६ रोजी भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी बनावट पदवीप्रकरणाच्या सुनावणीदरम्यान काही बेरोजगार व्यक्तींबाबत 'झुरळांप्रमाणे' अशी टिप्पणी केली. या विधानाची देशभर चर्चा झाली. याच पार्श्वभूमीवर अभिजित दीपके यांनी समाजमाध्यमांवर व्यंगात्मक प्रश्न विचारला - 'जर सर्व झुरळे एकत्र आली तर काय होईल?' या कल्पनेतून Cockroach Janta Party (CJP) या व्यंगात्मक, अराजकीय युवा चळवळीचा जन्म झाला. अल्पावधीतच या चळवळीला समाजमाध्यमांवर दोन कोटींपेक्षा अधिक युवकांचा प्रतिसाद मिळाला आणि ती देशभर चर्चेचा विषय ठरली. अमेरिकेतून भारतात आंदोलनासाठी परतले. समाजमाध्यमांवरील आंदोलनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जनतेमध्ये जाऊन प्रश्न मांडावेत, या उद्देशाने अभिजित दीपके ६ जून २०२६ रोजी अमेरिकेतून भारतात आले. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे छायाचित्र असलेले पुस्तक हातात घेऊन त्यांनी भारतभूमीवर पाऊल ठेवले. त्याच दिवशी जंतरमंतर येथे एकदिवसीय आंदोलन करण्यात आले. जयभीमच्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. या आंदोलनात लडाखचे वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

**चळवळीचे उद्दिष्ट :** बेरोजगारी, पेपरफुटी, शिक्षणव्यवस्थेतील त्रुटी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि युवकांचे प्रश्न व्यंगात्मक पद्धतीने देशासमोर मांडणे हा CJP चा प्रमुख उद्देश असल्याचे अभिजित दीपके आणि संघटनेचे प्रवक्ते सौरव दास, आशुतोष रांका व विजेता दहिया यांनी स्पष्ट केले आहे. या चळवळीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही केली.

**देशभर विस्तारलेले आंदोलन :** दिल्लीतील आंदोलनानंतर पुणे, लखनौ, अमृतसर, हैदराबाद, जयपूर आणि नागपूर येथेही आंदोलने करण्यात आली. जयपूरमध्ये आंदोलनादरम्यान अभिजित दीपके यांच्यावर हल्लाही झाला. परीक्षांमधील अनियमितता आणि वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतरमंतर येथे दुसऱ्यांदा आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक, दिल्ली उच्च न्यायालयातील वकील दिलशाद चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**दीपके यांची भूमिका :** अभिजित दीपके म्हणतात, “गेल्या १०-१२ वर्षात देशाचे राजकारण फक्त हिंदु-मुस्लिम अजेंड्याभोवती फिरत आहे. परंतु, या मुद्द्यांमुळे तरुणांना नोकऱ्या मिळणार नाहीत. आता देशातील राजकारणाचा रोख बदलून तो रोजगार आणि शिक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयांवर येणे गरजेचे आहे,” समाजासाठी निवडलेला संघर्षाचा मार्ग : अभिजित दीपके यांनी इच्छिले असते तर अमेरिकेत सुखसोयींचे जीवन जगणे त्यांना सहज शक्य होते. परंतु त्यांनी वैयक्तिक प्रगतीपेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले आणि युवकांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष आंदोलनाच्या मैदानात उतरले. जो व्यक्ती स्वतःच्या सुखापेक्षा समाजाच्या प्रश्नांना महत्त्व देतो, त्याचे समर्पण आणि संघर्ष निश्चितच उल्लेखनीय ठरतात.

**वाढता जनसमर्थन :** अभिजित दीपके यांच्या नेतृत्वाखालील CJPला सामान्य नागरिक, विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी नेते, विविध राजकीय व्यक्तिमत्त्वे तसेच सर्वोच्च न्यायालयातील काही नामवंत वकिलांचा पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येते. पंजाबमधील काही शेतकरी संघटना आणि खाप पंचायतींनीही या आंदोलनाला समर्थन दिले आहे.

**नेतृत्वाचे मूल्यमापन :** गेल्या महिनाभरातील त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यास अभिजित दीपके यांच्यामध्ये कुशल संघटक, धाडसी नेतृत्व, निःस्वार्थी वृत्ती, निर्भयता, निगर्वी स्वभाव, प्रभावी वक्तृत्व, सभाधीटपणा आणि डिजिटल कम्युनिकेशनचे उत्कृष्ट कौशल्य दिसून येते. अल्पावधीत लाखो युवकांना एका समान उद्दिष्टासाठी एकत्र आणणे, ही त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वाची जमेची बाजू आहे.

**शेवट नव्हे... संघर्षाची सुरुवात :** अभिजित दीपके यांचा निर्धार त्यांच्या शब्दांत स्पष्ट होतो, “मी धैर्य गमावलेले नाही आणि माझा प्रवासही थांबलेला नाही. माझ्या न्याय्य मागण्या मान्य होईपर्यंत माझा संघर्ष आणि माझा आवाज सुरूच राहील. परिस्थिती कितीही कठीण असली तरी न्याय आणि माझ्या हक्कांसाठी मी ठामपणे पुढे चालत राहीन. थकून थांबणे हा माझ्या स्वभावात नाही. माझी ठाम भूमिका हीच माझी खरी ताकद आहे. माझ्या मागण्या पूर्ण होईपर्यंत मी या भूमिकेपासून माघार घेणार नाही. मी शेवटपर्यंत लढत राहीन.” आजच्या काळात युवकांना केवळ घोषणांची नव्हे, तर प्रश्न विचारणाऱ्या, संवाद साधणाऱ्या आणि लोकशाही मार्गाने संघर्ष करणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. अभिजित दीपके यांच्या नेतृत्वाची दिशा, कार्यपद्धती आणि पुढील वाटचाल यांचे अंतिम मूल्यमापन काळ करेल; मात्र अल्पावधीत त्यांनी युवकांमध्ये जागरूकता निर्माण करून राष्ट्रीय पातळीवरील चर्चेला चालना दिली, हे निश्चित.●●



आर. के. जुमळे
93264 50506



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १९६

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा वर्धा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हिंदी विश्व विद्यापीठ वर्धा येथिल परिसरातील असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांची भेट सेवाग्राम येथे झाली होती. वर्धा जिल्हा सर्व क्षेत्रातील चळवळीचे केंद्र आहे. दिनविशेष कार्यक्रम येथे नित्यनेमाने साजरे होतात.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

# डॉ. बाबासाहेबांवरील निष्ठेतूनच 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' घडतो : इ.झेड. खोब्रागडे

### डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' पुस्तकाचे थाटात प्रकाशन

**नागपूर :** भर उन्हात ज्वालांचे शेले पांघरणारे डॉ. महेंद्रकुमार मेश्राम हे आंबेडकरनिष्ठ कवी व कार्यकर्ते असून ते केवळ व्यवस्थेला प्रश्न विचारुन थांबत नाही; तर त्यांच्या निराकरणासाठी रचनात्मक व विकासात्मक काम प्रामाणिकपणे करतात. बाबासाहेबांवरील निष्ठेतूनच 'उजेडवास्तवाचे कांतिसंग्राम' घडतो, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे यांनी केले.

प्रसिद्ध आंबेडकरी कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम द्वारा संकलित-संपादित 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' या पुस्तकाचे प्रकाशन रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, अर्पण सभागृह, मोरभवन, सीताबर्डी, नागपूर येथे झाले. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

संविधान फाऊंडेशन नागपूर द्वारा आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात स्तंभ पब्लिशिंग हाऊस द्वारा प्रकाशित 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' या पुस्तकाचे प्रकाशन माजी सनदी अधिकारी तथा संविधान फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष इ. झेड. खोब्रागडे, भाप्रसे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नाटककार तथा आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अँड लिटरेचरचे अध्यक्ष दादाकांत धनविजय, भाष्यकार म्हणून अ.भा. गौर बंजारा साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष डॉ. प्रकाश राठोड, प्रसिद्ध आंबेडकरी लेखक डॉ. अनमोल शेंडे, विशेष अतिथी म्हणून स्तंभ पब्लिशिंग हाऊस चंद्रपूरचे प्रकाशक कवी अविनाश पोईनकर व कवी सुरज दहागावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत थाटात झाले. ज्येष्ठ नाटककार दादाकांत धनविजय यांनी डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या चळवळीतील जडणघडणीवर प्रकाश टाकत डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांची कविता निर्भिड,



वास्तव व विद्रोही असून माणुसकीची उत्कट लागलेली आहे. आयुष्यातील दुःख व वेदनांना कवटाळत न बसता डॉ. महेंद्रकुमार मेश्राम हे प्रखर आंबेडकरवादी कवी आपल्या कवितेतून व नाविण्यपूर्ण सामाजिक उपक्रमातून अविश्रांतपणे संविधानिक मूल्यांचा जागर करतात, असे विचार भाष्यकार डॉ. अनमोल शेंडे व डॉ. प्रकाश राठोड यांनी व्यक्त केले. अविनाश पोईनकर व सुरज दहागावकर यांनी प्रकाशकीय मनोगत व्यक्त केले. नामांकित कवी, लेखक, कादंबरीकार, कथालेखक, नाटककार, चित्रकार, छायाचित्रकार, पत्रकार व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या साक्षीने थाटात झालेल्या या अभूतपूर्व सोहळ्याला आंबेडकरवादी साहित्य रसिकांची मोठी गर्दी होती. प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम यांनी संपादकीय भूमिका मांडली. सेवादल महिला महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. सुशील मेश्राम यांनी रसंचालन केले. संविधान प्रास्ताविकेचे वाचन निर्जरा मेश्राम यांनी केले तर आभार प्रदर्शन छाया मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. पुस्तक प्रकाशन सोहळ्यास डॉ. जयराम खोब्रागडे, ज्येष्ठ कवी इ.मो. नारनवरे, विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध कवी लोकनाथ यशवंत, कवी-नाटककार शालिक जिल्हेकर, कवी संजय गोडघाटे, कवी-कादंबरीकार नरेंद्र शेलार, कवी मनोहर गजभिये, प्राचार्य डॉ. शुभांगी वडस्कर, प्राचार्य डॉ. नरेश कोलते, निवृत्त उपजिल्हाधिकारी रामभाऊ आंबुलकर, कवी-गझलकार सूर्यकांत मुनघाटे, समीक्षक डॉ. पुनम येसंबरे, बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजुरकर, ज्ञानेश्वर रक्षक, कवी-गझलकार हृदय चक्रधर, चित्रकार संजय मोरे, प्राचार्य केतन सोनपिंपळे, प्रा. अमोलसिंह रोटेले, अमर बागडे, निवृत्त गटशिक्षणाधिकारी गौतम मेश्राम, पौर्णिमा मेश्राम, डॉ. प्रशांत सूर्यवंशी, डॉ. नंदकिशोर भगत, कवी-दिग्दर्शक नागेश वाहूरवाघ, कवी महेंद्र गायकवाड, पत्रकार सुरेंद्र गोंडाणे, कवी माणिकराव खोब्रागडे, कवी लीलाधर गायकवाड, अतुलकुमार खोब्रागडे, उमेश कोर्राम, प्रा. दीपरत्न राऊत, डॉ. शालिनी तोरे, प्रा. कल्पना मुकुंदे, प्राचार्य डॉ. श्रीपाद नायब, सिनेट सदस्य डॉ. श्रीकांत भोवते, प्रसिद्ध छायाचित्रकार नानू नेवरे, माजी शिक्षणाधिकारी चौधरी, मोहन चव्हाण, नरेश धोपटे, डॉ. विनायक साखरकर, डॉ. बाबा शंभरकर, डॉ. सुलोक रघुवंशी, डॉ. विजय तुपे, डॉ. व्यंकटी नागरगोजे, कवी डॉ. भूषण भस्मे, सुषमा योगेंद्र मेश्राम, डॉ. भीमराव मेश्राम, हरिदास बेलेकर, डॉ. मनीष वानखेडे, कवी प्रकाश बावनगडे, कवी शेषराव नेवारे, प्रा. नितेश मोटघरे, डॉ. प्रमोद सातंगे, डॉ. प्रमोद कान्हेकर, मअंनिसचे गौरव आळणे, जलेंद्र मेश्राम, सुकुशल पाटील, प्रा. वर्षा मेश्राम बांबोडे, डॉ. बाबा मेश्राम, मंगलप्रसाद रहांगडाले, जयंत कोसनकर इत्यादी साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रेखा खोब्रागडे, दिपक निरंजन, छाया मेश्राम, अल्का निरंजन, विजय बेले, दिगांबर गोंडाणे, हरिदास बेलेकर, नेहा खोब्रागडे, नमा खोब्रागडे, निर्जरा मेश्राम, शिरीष कांबळे, कल्पना कांबळे, निलेश बोबडे, राजीव काथवटे, रश्मी चांदुरकर, शरदसिंह बैस, सतीश भराडे, राजेंद्र झोड, गोकुळ आष्टणकर, सदाशिव गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

## महत्वाचे

### बार्टीकडून एमपीएससी मुख्य परीक्षा तयारीसाठी १५ हजारांचे आर्थिक सहाय्य

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा व स्थापत्य अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रत्येकी ₹१५,००० इतके एक रकमी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या संदर्भातील सविस्तर जाहिरात व ऑनलाइन अर्ज बार्टीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बार्टीतर्फे करण्यात आले आहे.

### जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी नागरिकांची हेलपाटे; मनपा कार्यालयात प्रचंड गर्दी



**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून, लांब रांगा आणि तासन्तास प्रतिक्षा करावी लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, दुरुस्ती, विलंबित नोंदणी आदी कामांसाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. नियमांतील बदल आणि पडताळणी प्रक्रियेमुळे अर्जदारांची संख्या वाढल्याने विभागावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. अधिक कर्मचारी नियुक्त करणे, अतिरिक्त काउंटर सुरू करणे, टोकन प्रणाली प्रभावीपणे राबविणे आणि ऑनलाइन सेवा सक्षम करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### राज्यसेवा, अभियांत्रिकी मुख्य परीक्षेच्या उमेदवारांना 'बार्टी'चे आर्थिक सहाय्य

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) राज्यसेवा पूर्व परीक्षा आणि स्थापत्य अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीच्या (SC) उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी एकरकमी आर्थिक सहाय्य देण्याची योजना घोषित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रत्येकी १५,००० रुपये एक रकमी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना आर्थिक मदतीचा हात मिळावा, जेणेकरून त्यांना मुख्य परीक्षेची तयारी अधिक सक्षमपणे करता येईल, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

### मनपा इमारतीतील रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणालीचा महापौरांच्या हस्ते शुभारंभ




**नागपूर :** मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शहरातील मनपाच्या 75 इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणाली उभारण्याच्या उपक्रमाचा महापौर श्रीमती निता ठाकरे यांच्या हस्ते व मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (ता.06) फित कापून शुभारंभ करण्यात आला. लकडगंज झोन इमारतीच्या प्रांगणात आयोजित समारंभात सत्तापक्ष नेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, नगरसेवक तथा एनआयटी विश्वस्त शेषराव गोतमारे, झोन सभापती महेश्वरी बिसेन, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीचे सभापती मनीषा अतकरे, कर आकारणी समिती सभापती सरिता कावरे, नगरसेवक अरुण हरोडे, प्रदीप पोहणे, रामदास शाहू, नगरसेविका शीतल रारोकर, श्रीमती निरंजना पाटील, दुर्गेश्वरी कोसेकर, झोनचे सहायक आयुक्त शविजय थूल, कार्यकारी अभियंता सचिन रक्षमवार, सीपीएस एन्व्हायरो टेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,नागपूरचे प्रभात धाडीवाल, ज्ञानचंद बोहरा, आकाश बोहरा यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते. मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मनपाच्या 75 इमारतींमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणाली तयार केली जात आहे.

## आटपाडीत ११ जुलैला साहित्यरत्न डॉ. शंकरराव खरात यांना अभिवादन सभा

**आटपाडी (जि. सांगली) :** साहित्यरत्न डॉ. शंकरराव खरात प्रतिष्ठान, आटपाडी यांच्यावतीने थोर साहित्यिक, समाजप्रबोधनकार व विचारवंत साहित्यरत्न डॉ. शंकरराव खरात यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, ११ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता 'श्रीमंत बाबासाहेब देशमुख सूत गिरणी, आटपाडी' येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र अण्णा देशमुख राहणार आहेत. डॉ. खरात यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि पुरोगामी विचारांचा जागर करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

तालुक्यातील व जिल्ह्यातील साहित्यिक, साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे सचिव विलास खरात यांनी केले आहे.

## ध्येयवादी समाजसेवक पंडित गायकवाड यांचे निधन

**नागपूर :** बुद्धभूमीचे निर्माते, ध्येयवादी समाजसेवक आणि परिवर्तनवादी विचारांचे निष्ठावान कार्यकर्ते पंडित गायकवाड यांचे ५ जुलै २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक, शैक्षणिक व बौद्ध चळवळीची मोठी हानी झाली आहे.

२०१८ मध्ये परिवर्तन विचार मंचाची स्थापना झाल्यानंतर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि साहित्य क्षेत्रातील विविध उपक्रमांना गती मिळाली. साहित्य मेळावे, पुस्तक प्रकाशन, कवी संमेलन, चर्चासत्रे, संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन तसेच लोकांमध्ये जाऊन आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये पंडित गायकवाड यांचा सक्रिय सहभाग होता. या कार्यादरम्यान त्यांची भेट झाली आणि त्यांनी आपल्या जीवनातील अनेक हृदयस्पर्शी आठवणी सांगितल्या. विलास गजभिये, प्रा. भीमराव गायकवाड आणि ज्ञानेश्वर रक्षक यांनी त्यांच्या सोनुली गावाला



भेट दिली होती. भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांच्या सीमेवरील या गावाजवळील टेकडीवर त्यांनी स्वतःच्या श्रमदानातून उभारलेली बुद्धभूमी आजही त्यांच्या कार्याची साक्ष देते. त्या टेकडीवर उभारलेला गौतम बुद्धांचा भव्य पुतळा आणि दुर्गम जंगल परिसरात विद्युत सुविधा पोहोचविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत.

पंडित गायकवाड यांची चिकित्सक वृत्ती, सत्यनिष्ठ भूमिका आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द विशेष उल्लेखनीय होती. सत्याची कास धरल्यामुळे त्यांना अनेक सामाजिक संकटांचा सामना करावा लागला. संधीसाधू लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला, त्यांची गावातून विवस्त्र धिंड काढली; मात्र त्यांनी सत्याचा मार्ग सोडला नाही. अखेरीस शासनाने त्यांच्या भूमिकेची दखल घेत न्याय दिला.

प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षण दिले आणि त्यांना शासकीय सेवेत स्थिर केले. साधा ग्रामीण पोशाख, डोक्यावर निळी टोपी, गळ्यात निळा दुपट्टा आणि सायकलवरून गावोगाव फिरत समाजप्रबोधन करणारे पंडित गायकवाड यांनी आपल्या विचारांचा ठसा समाजमनावर उमटविला. शासकीय कार्यालयांशी सातत्याने पत्रव्यवहार करून अनेक लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

परिवर्तन विचार मंचातर्फे २०२३ मध्ये त्यांना 'परिवर्तन जीवनगौरव पुरस्कार' प्रदान केला होता. या पुरस्काराची दोन हजार रुपये रक्कम त्यांनी दैनिक बहुजन सौरभला समाजकार्याकरिता परत दिली. समाजाकडून मिळालेला सन्मान पुन्हा समाजालाच अर्पण करणारे ते अत्यंत प्रामाणिक आणि निःस्वार्थ व्यक्तिमत्त्व होते.

अशा ध्येयवादी, सत्यनिष्ठ आणि समाजहितासाठी आयुष्य वेचणाऱ्या पंडित गायकवाड यांच्या निधनाने परिवर्तनवादी चळवळीतील एक दीपस्तंभ हरपला आहे.

## लेखक विभूतीचंद्र गजभिये संपादित कथासंग्रहाचे प्रकाशन

### रवी दलाल यांच्या निवडक कथा सामाजिक भान जपणाऱ्या : ई.झेड. खोब्रागडे



**नागपूर :** समाजव्यवस्थेने नाकारलेला शेवटच्या घटकांतील माणूस रवी दलाल यांच्या कथेचा केंद्रबिंदू असून त्यांच्या कथा सामाजिक भान जपणाऱ्या आहेत असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे यांनी केले, ते नागपूर येथे विभूतीचंद्र गजभिये संपादित रवी दलाल यांच्या निवडक कथा या कथासंग्रहाचे प्रकाशन सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून बोलत होते.



बोलतांना पुढे खोब्रागडे म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत साहित्यिकांनी संविधानवादी भूमिका घेऊन आपले कर्तव्य म्हणून समोर आणले पाहिजे, रवी दलाल यांच्या कथेने उपेक्षित माणसांचा आवाज बुलंद केला आहे.'रवी दलाल यांच्या निवडक कथा' शिर्षक असलेला कथासंग्रह विभूतीचंद्र गजभिये यांनी पुस्तक रुपाने प्रकाशित केला. प्रकाशन सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृह, लष्करीबाग नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे होते तर उद्घाटक म्हणून डॉ. लालसिंग मिसाळ होते. मंचावर प्रसिद्ध कथाकार डॉ. रवी दलाल, बाळासाहेब काळे, (निवृत्त उपसंचालक भूमिअभिलेख पुणे), अशोक सरस्वती , रामभाऊ डोंगरे, विकास राऊत, (अक्षरशिल्प प्रकाशन अमरावती), प्रा. वीरेन्द्रबाबू इंगळे (पथदर्शक साहित्य मंच काटोल), डॉ. भन्ते अभयनायक, डॉ. कृष्णकांत डोंगरे व लेखक विभूतिचंद्र गजभिये इत्यादी मान्यवर विराजमान होते. मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या छायाचित्रांना हार अर्पण व द्वीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शोभा पाटील यांनी संविधान उद्देशीकेचे वाचन केले तर पथदर्शक साहित्य मंचाचे उपाध्यक्ष विरेंद्र इंगळे यांनी प्रस्तावना केली. त्यानंतर माजी सनदी अधिकारी ई. झेड. खोब्रागडे व मान्यवरांच्या हस्ते 'रवी दलाल यांच्या निवडक कथा' या कथासंग्रहाचे प्रकाशन केले.

या प्रसंगी बोलतांना कथाकार डॉ. रवी दलाल म्हणाले की, माझ्या निवडक कथा संपादित करून विभूतीचंद्र गजभिये यांनी यांच्यातील सामाजिक जाणीवेची तळमळ उजागर केली आहे. तीस वर्षापासून माझ्या कथा-मासिक दिवाळी अंक साप्ताहिक पेपरमध्ये विखुरलेल्या होत्या. त्या एकत्रीत करणे खरोखर अवघडच काम होते. तरी विभुतीचंद्र गजभिये यांनी कथा एकत्रीत करून वाचकांच्या पुढे नव्या स्वरूपात दर्जेदार कथासंग्रह ठेवला आहे. साहित्य क्षेत्रांत मी पाहिले बरेच लेखक हे पैसा, प्रसिद्धी आणि ओळखीच्या लिफ्टने वर जातात. पण लेखक विभुतीचंद्र गजभिये यांनी अनेक पायऱ्या चढून ही प्रसिद्धी गाठली आहे. प्रसिद्ध किर्तनकार अशोक सरस्वती म्हणाले की, विभूतीचंद्र गजभिये व रवी दलाल या दोघांना मी त्यांच्या बालपणापासूनच ओळखतो. त्यापैकी विभुतीचंद्र गजभिये ते शोषित वंचितांच्या मदतीला धावून जाणारे त्यागमयी व्यक्तित्त्व असून साहित्य क्षेत्रांत घेतलेली भरारी आश्चर्यजन आहे. सर्व वक्त्यांच्या भाषणाचा मागोवा घेत अध्यक्ष ई.झेड. खोब्रागडे यांनी आपले विचार मांडले.

रवी दलाल यांच्या कथा संकलित करून विभूतीचंद्र गजभिये यांनी साहित्य क्षेत्रात परिवर्तनाची पताका रोवली आहे. याप्रसंगी उत्तर देतांना लेखक विभूतीचंद्र म्हणाले की, साहित्य हे समाजाचा आरसा आहे. सामाजिक धार्मिक घडामोडीच दर्शन करण्याची जबाबदारी जागृत लेखकाची असते, तेच काम मी केले आहे हे जाणीव रवी दलाल यांनी करून दिली, म्हणून रवी दलाल हे साहित्य क्षेत्रांतील गुरू आहेत. हे कार्य मी केवळ माझ्या सहचारिणी दर्शनामुळेच करू शकलो. या यशस्वीतेचे श्रेय माझ्या पत्नीला जाते. कार्यक्रमाचे संचालन कवी सागर भवते यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य वसंत वावरे यांनी केले. कार्यक्रमाला- देवानंद बडगे, चित्तरंजन चौरे, नरेश महाजन, प्रा. पुष्पा घोडके, शोभा पाटील, नंदा भगत, दीप्ती नाईक, अर्चना राडे, भोला सरवर, आनंद मेश्राम, सुनीता रमेश ढवळे, वर्षा सहारे, वर्षा टेंभेकर, डॉ. सुनील भगत, विजय गवई, निलेश खोब्रागडे, सुरेश खडसे, अरुण ठवकर, दिलीप पाटील, दिनेश वाघमारे, प्रफुल्ल नारडवार, श्रीपाद गोरे बहुजन हिताय संघ, कृती समिति भूमिअभिलेख कर्मचारी संघटना कार्यकर्ते, कास्ट्राईब भूमिअभिलेख कर्मचारी संघटना व बराच मोठा मित्र परिवार उपस्थित होता.



## 'कहीं हम भूल न जायें' अभियानांतर्गत आठवी विद्यार्थी परिषद यशस्वी

**नागपूर :** 'कहीं हम भूल न जायें' या अभियानाच्या विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्फरन्स हॉल, उरूवेला कॉलोनी, वर्धा रोड, नागपूर येथे आठव्या विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर परिषदेला विविध जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांनी आवर्जून हजेरी लावली होती. 'कहीं हम भूल न जायें' या अभियानाच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना चळवळीच्या धड्यांचे बाळकडू पाजून आणि तावून सुलाखून तयार करण्यात येत आहे. परिषदेमध्ये वक्तव्य ठेवताना विद्यार्थ्यांच्या मुखातून यलगाररुपी भीमगर्जनांचा उद्रेक होत होता. आंबेडकरवादी चळवळीच्या प्रत्येक सैनिकाच्या वक्तृत्वातून आंबेडकरवादी चळवळीप्रति आजीवन पत्करलेला दृढ निश्चय झळकत होता.

परिषदेच्या उत्तरार्धात मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक जडणघडणीच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. या परिषदेचे अध्यक्ष अॅड. रितेश पाटील (AoR, सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया) होते आणि प्रमुख मार्गदर्शक अॅड. अश्विनी मून होत्या.

एकूण 46 विद्यार्थ्यांनी विविध नियोजित विषयांवर तर्कशुद्ध वक्तव्य परिषदेत मांडले. परिषदेची प्रस्तावना मेघना पराते, संचालन तन्मय वानखेडे, मानस पाटील, विदिशा बोदलकर आणि करूणा सोनुले. आभार प्रदर्शन असीत फुले यांनी केले. सदर आठवी विद्यार्थी परिषद महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेल्या 200 कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पडली.



## बाल संरक्षण क्षेत्रात विशेष कार्य व सेवेसाठी सेलोकार यांचा सत्कार

**नागपूर :** बाल विकासाच्या क्षेत्रात 40 वर्षा पासून अनाथ व निराधार बालकांकरीता निस्वार्थ कार्य करणाऱ्या शिवशंकर सेलोकर यांच्या कार्याचा जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी साविस्तर परिचय करून दिला. ग्लोबल इंटरनॅशनल फाउंडेशन च्या वतीने यांना प्रशस्ती पत्र देउन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ग्लोबल इंटरनॅशनल फाउंडेशन च्या चेअरमन डॉ मनीषा ठाकरे व इतर मान्यवर उपस्थित होते. सेलोकर यांचे गरजू बालकांकरिता सरकारची कोणतीही मदत न घेता हे कार्य इंडियन चिल्ड्रेन वेल्फेअर ट्रस्ट च्या माध्यमातून निरंतर सुरू आहे. बाल संगोपन योजना, कायदेशिर दत्तक प्रक्रिया याकरिता निःशुल्क सल्ला व मार्गदर्शन यांच्या तर्फे करण्यात येत आहे सेलोकर सध्या बाल कल्याण समिती सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

## ओबीसी विभागाच्या कार्यकर्ता मेळाव्यात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**नागपूर :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागातर्फे देवडिया काँग्रेस भवन, महाल येथे ओबीसी कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे होते. यावेळी रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्याम बर्वे, माजी मंत्री सुनील केदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर, काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते अतुल लोंढे, एआयसीसी ओबीसी विभागाचे राष्ट्रीय समन्वयक अजय हटेवार, काँग्रेस नेते गिरीश पांडव, माजी महिला व बालकल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळे तसेच एआयसीसी ओबीसी विभागाचे महाराष्ट्र समन्वयक




रामरतन पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्यात नागपूर विभागातील नवनियुक्त शहर व ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांचा नागरी सत्कार करण्यात आला. यामध्ये नागपूर शहराध्यक्ष प्रफुल गुडधे, वर्धा जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे, गोंदिया जिल्हाध्यक्ष अमर वराडे आणि गडचिरोली जिल्हाध्यक्ष विश्वजित कोवासे यांचा गौरव करण्यात आला. तसेच ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेल्या नागपूर महानगर पालिकेतील नगरसेवकांचाही सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व विदर्भातील ओबीसी विभागाच्या संघटन विस्तारासाठी नागपूर (ग्रामीण) जिल्हाध्यक्ष रमेश कारामोरे, नागपूर (शहर) अध्यक्ष प्रशांत पवार, वर्धा जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण माऊसकर, भंडारा जिल्हाध्यक्ष श्रीकांत येरपुडे, भंडारा (शहर) अध्यक्ष जीवन कावळे, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष उमाकांत धांडे, गोंदिया जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे आणि गडचिरोली जिल्हा कार्याध्यक्ष मनोज ढोरे यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. या मेळाव्यास महाराष्ट्र प्रदेश, विभाग, शहर व जिल्हास्तरीय पदाधिकारी तसेच ओबीसी विभागाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजय भिलकर, चंद्रकांत हिंगे, सचिन निंबार्ते, भूषण तल्हार, विजयाताई धोटे, संध्याताई बिसेन, विजया गोरे, वीणा जंजाळ, सुनीता जिचकार, उमाकांत धांडे, मनोज ढोरे, श्रीकांत धोटे, माधवराव गावंडे, रमेशमामा राऊत, प्रमोद शिंगणे, संतोष गोटाफोडे, अरविंद क्षीरसागर, आशिष काळे आणि शिवम पलांदुरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648